CMYK

LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818

गंमत भंडारी
बीड वर्ष ३६ वे अंक ११२ वा फोन २३०१०१ दिनांक २२ मार्च २०२६ रविवार | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# डॉ.ज्योती मेटेंना महिला आयोगाचे अध्यक्ष करा
# प्रशासनाचा अनुभव असल्याने पदाला न्याय मिळेल



**मुंबई दि.२१ (प्रतिनिधी):– राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदाचा रुपाली चाकणकर यांनी राजीनामा दिल्यानंतर या पदावर योग्य व्यक्तिची नियुक्ती झाली पाहिजे याची चर्चा सुरु झाली आहे. त्यात डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांचे नाव अगदी योग्य आहे. ज्योतीताईंना प्रशासनाचा दीर्घ अनुभव आहे. कायद्याचे सखोल ज्ञान आहे. पारदर्शक कारभार त्यांनी त्यांच्या उच्च पदावर असतांना केलेला आहे. सर्वसामान्यांना निश्चित न्याय मिळेल अशी भूमिका त्यांची राहील अशा सर्व अर्थाने या पदासाठी पात्र असणाऱ्या ज्योतीताईंना महिला आयोगाचा कारभार सुपुर्द करावा अशी मागणी होत आहे.**

महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी महिला आयोगाच्या अध्यक्षपदी संवेदनशील, उच्चशिक्षित आणि दीर्घ प्रशासकीय अनुभव असलेली व्यक्ती असणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. अलीकडे घडलेल्या काही दुर्दैवी घटनांच्या पार्श्वभूमीवर विद्यमान अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले आहे. त्यामुळे या महत्त्वाच्या पदासाठी सक्षम आणि अनुभवी व्यक्तीची नियुक्ती करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.
डॉ.ज्योती मेटे यांनी महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागात वर्ग-१ अधिकारी म्हणून सुमारे ३० वर्षे सेवा बजावली आहे. प्रशासकीय कामकाजातील अनुभव, कायदेशीर जाण आणि कार्यकौशल्यामुळे त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. तसेच त्या आयएएस पदासाठीही नामांकित झाल्या होत्या. एप्रिल २०२४ मध्ये अतिरिक्त निबंधक पदावरून त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. पान २ वर

## सोशल मीडियावरही मागणी

डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांची महाराष्ट्र राज्य महिला आयोगच्या अध्यक्षपदी नियुक्ती करावी, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून पुढे येत असून याबाबत सोशल मीडियावरही जोरदार चर्चा सुरू झाली आहे. अनेकांनी सोशल मीडियावर आपली मते व्यक्त करत डॉ. ज्योतीताई मेटे यांच्यासारख्या अनुभवी आणि संवेदनशील व्यक्तीला महिला आयोगाच्या अध्यक्षपदी संधी द्यावी, अशी मागणी केली आहे.



बीड: शहरातील ईदगाह मैदान येथे पवित्र रमजान ईदनिमित्त आयोजित कार्यक्रमात मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, बीड विधानसभा मतदार संघाचे आ.संदीपभैय्या क्षीरसागर, गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ.विजयसिंह पंडित, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्यासह उपस्थित मान्यवर. बीड शहरातही विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मुस्लिम बांधवांना भेटून ईदच्या शुभेच्छा दिल्या.

## बीड जिल्ह्यात रमजान ईद उत्साहात साजरी

बीड दि.२१ (प्रतिनिधी):- अतिशय मोठा आणि पवित्र असा सण रमजान ईद जिल्ह्यात उत्साहात साजरा करण्यात आला. मुस्लिम बांधवांनी एकमेकांना भेटून शुभेच्छा दिल्या. हिंदु बांधवांनीही मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. नवीन कपडे, गोडधोड पदार्थ, नवीन वस्तू मुस्लिम बांधवांनी खरेदी केल्या. समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल असणाऱ्यांनाही या वस्तू प्रदान करण्यात आल्या. लहान, थोर, महिला या सर्वांनी नातेवाईक, स्नेही यांना ईद निमीत्त प्रत्यक्ष भेट घेऊन व फोनद्वारे शुभेच्छा दिल्या.

## विकृत कॅप्टन अशोक खरातची ७ तास चौकशी



- अनेक मोठी नावं समोर येणार ?
- राजकीय संबंध उघड होणार !

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी):- महिलांचे लैंगिक शोषण केल्या प्रकरणी भोंदूबाबा अशोक खरातवर बलात्काराचा गुन्हा दाखल असून त्याची एसआयटीकडून चौकशी केली जात आहे. खरात प्रकरणी तांत्रिक पुरावे गोळा करून मालमत्ता, आर्थिक संबंधाचे पुरावे आणि इतर माहिती एसआयटीकडून गोळा करण्याचे काम सुरू आहे. खरातचे जबाब देखील नोंदवून घेतले जात असल्याची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे आज एसआयटीकडून खरातची तब्बल ७ तास चौकशी करण्यात आली. त्यानंतर एसआयटी पथकाने अशोकची पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.
आयपीएल तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वात एसआयटीकडून ही चौकशी सुरू आहे. या चौकशी दरम्यान अशोक खरातच्या ऑफिसमधील बॉय नीरज जाधव आणि खरातची पान २ वर

## भारतात LPG चा पुरवठा सुरळीत ?

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसेवा):- अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील युद्धामुळे भारतात गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याचा दावा करण्यात येत होता. अनेक ठिकाणी LPG गॅस सिलिंडरसाठी नागरिकांच्या रांगा लागल्याचंही पाहायला मिळालं होतं. मात्र, नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये, गॅसचा साठा पुरेसा उपलब्ध असल्याचा दावा केंद्र सरकारकडून करण्यात आला होता.



पण तरीही खबरदारीचा उपाय म्हणून सरकारने देशातील सर्वच राज्यात व्यावसायिक सिलेंडरच्या पुरवठ्याबाबत काही निर्बंध आणले होते. मात्र, घरगुती सिलेंडर देण्याला प्राधान्य देण्याच्या सूचना सरकारकडून गॅस वितरकांना देण्यात आल्या होत्या. त्यामुळे याचा सर्वाधिक फटका हॉटेल व्यावसायिकांना बसला होता. मात्र, आता केंद्र सरकारने व्यावसायिक LPG च्या पान २ वर

## भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा राज्य हज कमिटीचे सदस्य
# एजाज देशमुख यांचे निधन



बीड दि. २१ (प्रतिनिधी):- भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य हज कमिटीचे सदस्य एजाज वहिदअली देशमुख (रा. बीड) यांचे अल्पशा आजाराने शनिवार दि.२१ मार्च रोजी दुपारी छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरू असताना निधन झाले. मृत्यसमयी ते ५५ वर्षांचे होते.त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा , एक मुलगी असा परिवार आहे. गेल्या तीन दशकांपासून एजाज देशमुख हे भाजपशी जोडलेले होते. त्यांच्या निधनामुळे राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान बीड येथील शहेंशाहवली दर्गाह परिसरातील कब्रस्तानमध्ये शनिवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास शोकाकुल वातावरणात त्यांचा दफनविधी करण्यात आला.
एजाज देशमुख हे बीड येथील रहिवासी होते. विद्यार्थी चळवळीपासूनचे ते समाजकारण आणि राजकारणाशी जोडले गेले होते. भाजपचे निष्ठावंत म्हणून त्यांनी विविध पदांवर कार्य केले. दीर्घकाळ भाजपमध्ये विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या. अल्पसंख्याक समाजात पक्षाची पकड मजबूत करण्यासाठी त्यांनी विशेष काम केले होते. भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे पान २ वर

# मुख्यमंत्र्यांनी घोषीत केलेला १७ हजाराचा विमा द्यावा


## भाई गंगाभीषण थावरे यांची मागणी



### शिष्टमंडळ येणाऱ्या २३ मार्च रोजी जिल्हाधिकारी यांना भेटणार

माजलगाव दि.२१ (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यात २०२५ झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा झालेले नुकसान भरपाई देण्यात १७ हजार हेक्टरी विमा देण्याची घोषणा मुख्यमंत्री यांनी विधानसभा मध्ये केली होती, त्याची अंमलबजावणी होत नाही म्हणून या मागणीसाठी शेतकरी संघर्ष समितीचे भाई गंगाभीषण थावरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्यातील शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ जिल्हाधिकारी यांना भेटणार असून त्याच्या मार्फत एक निवेदन मुख्यमंत्री यांना देण्यात येणार असल्याचे प्रसिद्धीस दिले आहे.
या पत्रकात पुढे म्हटले आहे की मुख्यमंत्री यांनी विधानसभा सभागृहात बीड जिल्ह्यात सन मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. त्या वेळी सभागृहात शेतकऱ्यांना सरसगट हेक्टरी १७००० विमा देण्याची घोषणा मुख्यमंत्री साहेबांनी केली होती. परंतु आजपर्यंत अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात एक रुपयाही जमा झालेला नाही. घोषणा मोठ्यामोठ्या केल्या जातात, पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या मदतीसाठी प्रशासनाची गती का कमी पडते ? हा प्रश्न आज प्रत्येक पान २ वर

## खजाना विहिरीजवळ अपघात
## तरुण जागीच ठार




बीड दि.२१ (प्रतिनिधी):- सोलापूर-धुळे महामार्गावर वडगाव फाट्याजवळ शनिवारी रात्री १०.३० वाजता दुचाकीवरुन जाणाऱ्या तरुणाला मागून येणाऱ्या वाहनाने जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार जागीच ठार झाला. अपघात घडल्यानंतर चार चाकी गाडी चालकाने घटनास्थळावरुन पोबारा केला. या ठिकाणी असलेले युवा नेते प्रेम कांबळे यांनी तातडीने १०८ क्रमांकावर कॉल करुन ॲम्ब्युलन्सला माहिती दिली. मात्र ॲम्ब्युलन्स वेळेवर न पोहोचल्याने ॲटोरिक्षामध्ये अपघास्तग्रस्त तरुणाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु रक्तस्त्राव जास्त झाल्यामुळे सदर तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अपघातातील मृत तरुणाची ओळख अद्याप पटली नसून पोलीस तपास करीत आहेत.

# मुर्शदपूरमध्ये लेप काढला अन् समोर आली आकर्षक हनुमानाची मूर्ती



मूर्तीवर लेप असतांना



मूर्तीवरील लेप काढल्यानंतर

बीड दि.२१ (प्रतिनिधी):- येथून जवळच असलेल्या मुर्शदपूर गावामध्ये गेल्या अनेक वर्षापासून भाविकांचे ग्रामदैवत असलेल्या तेल्या मारुती या मुर्तीवरील लेप निघू लागला होता, तो मुर्तीचा लेप पूर्ण काढल्यानंतर आत कोरीव पाषाणाची आकर्षक अशी मारुतीची मूर्ती दिसून आली आहे. विशेष म्हणजे या मारुतीच्या मुर्तीला मिशा असल्याचे ग्रामस्थ सांगतात.
बीडपासून जवळच असलेल्या मुर्शदपूरमध्ये तेल्या मारुतीची मूर्ती गेल्या अनेक वर्षापासून आहे. साधारणत: ३०० ते ३५० वर्षापुर्वीची ही मूर्ती असावी. ग्रामस्थ या मारुतीच्या मुर्तीवर वर्षानुवर्षापासून तेल अर्पण करतात म्हणून याला तेल्या मारुती म्हटले जाते. तेल टाकून टाकून मूळ मुर्तीचा आकार बदलला होता. तेलाचे थर टाकून आत नेमकी मूर्ती कशी असावी याचा अंदाजच नव्हता.
तेलाचे थरावर थर साचून लेप तयार झाला होता. गावात पुर्वाभिमुख असलेली ही मूर्ती भाविकांचे श्रद्धास्थान असून नवसाला पावणारा मारुती म्हणून परिचीत आहे. गावात हनुमान जयंतीला उत्सव असतो, पान २ वर

2 BHK फ्लॅट किरायाने देणे आहे
सारडा संकुल, सुभाष रोड, बीड येथे प्रशस्त 2 BHK फ्लॅट किरायाने देणे आहे.
पिणे-वापरणे मुबलक पाणी उपलब्ध.
-: संपर्क :-
9960420388

# जिल्हा पोलीस दलात सीसीटीव्ही मोबाईल व्हॅनचा होणार प्रभावी वापर



बीड दि.२१ (प्रतिनिधी):- बीड जिल्हा पोलीस दलाकडून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सीसीटीव्ही मोबाईल त्यांचा वापर सुरू करण्यात आला आहे. गेवराई तालुक्यातील पाचेगाव येथील सदर व्हॅनचा वापर सुरू झाला आहे. सदर कंट्रोल रूम मोबाईल व्हॅन मध्ये २५ कॅमेरे आहेत. हे आहे तंत्रज्ञानाचा वापर करून सदर कॅमेरेद्वारा प्रत्येक व्यक्तीचा फोटो वेगळा काढून जतन करता येतो, तर वाहनाचे नंबरही अचूकपणे घेतले जातात. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच गुन्ह्याची उकल करण्यासाठी सदर कंट्रोल व्हॅनचा फायदा होणार आहे. पान २ वर

## आध्यात्मिक प्रगती, सकारात्मक जीवनशैली, समृद्धीचे रहस्य उलगडण्यासाठी
# बीडमध्ये कुबेर का खजाना परिसंवादाचे आयोजन

बीड दि.२१ (प्रतिनिधी):- जीवनातील नकारात्मकता दूर करून यशाच्या शिखराकडे जाण्यासाठी बीड नारायण रेकी सत्संग परिवाराच्यावतीने बीड जिल्हावासीयांसाठी एक प्रेरणादायी आध्यात्मिक सोहळा अयोजित करण्यात आला असून याचा बीड जिल्हा वासीयांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.
बीड नारायण रेकी सत्संग परिवार, बीड यांच्या वतीने नारिरत्न आग्रशिरोमणी व जागतिक विक्रमादित्य जीवन परिवर्तन वक्ता श्रीमती राजेश्वरजी मोदी (राज दीदी) यांच्या मार्गदर्शनाखाली कुबेर का खजाना या विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादात राज दीदी त्यांच्या सुमधूर वाणीतून सकारात्मक विचार, आध्यात्मिक उन्नती तसेच जीवनात समृद्धी कशी साध्य करावी यावर त्या मार्गदर्शन करणार आहेत. हा परिसंवाद सोमवार, २३ मार्च २०२६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १.०० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. शहरातील एम.आय.डी.सी.भागातील माँ वैष्णो पॅलेस, या ठिकाणी हा विशेष परिसंवाद कार्यक्रम संपन्न होणार आहे. सदर परिसंवादासाठी नाममात्र शुल्क आकारण्यात आले असून कार्यक्रमाच्या पान २ वर

CMYK

हौसला इंधन बदला! या तीन शब्दाभोवती फिरतो आदित्य धरचा 'धुरंधर- द रिव्हेंज' हा सिनेमा. कोणत्याही चित्रपटाचा दुसरा भाग चांगला नसतो हा सिनेप्रेमींचा गैरसमज 'धुरंधर २' पाहून शंभर टक्के दूर होणार आहे. याचा रनटाइम तब्बल ३ तास ५५ मिनिट आहे आणि यातील एकही मिनिट वाया जाणार नाहीये. कारण, प्रत्येक मिनिटाला तुम्हाला अनपेक्षित गोष्टी घडताना दिसतील. "Ladies and gentlemen, you are not ready for this" हे वाक्य आदित्य धरने खरं करून दाखवलं आहे.



# ३ तास ५५ मिनीटांचा थक्क करणारा धुरंधर-२

'धुरंधर २' हा संपूर्ण सिनेमा एकूण सात भागात विभागण्यात आला आहे. यातील पहिल्या भागाचं नाव आहे "A Burnt Memory". याच भागात प्रेक्षकांना पाहायला मिळेल जसकीरत सिंह रंगीचा भूतकाळ. तो अजय सान्याल यांच्या संपर्कात कसा येतो, कोणत्या कौटुंबिक गोष्टींचा परिणाम जसकीरतच्या संपूर्ण आयुष्यावर होतोया भागात भारतीय न्यायव्यवस्थेवर सुद्धा प्रश्न उपस्थित केले जातात. अखेर अजय सान्याल जसकीरतच्या आयुष्याला एक वेगळीच दिशा दाखवतात आणि हा मार्ग जसकीरत का स्वीकारतो, पंजाब ते पाकिस्तान हा प्रवास नेमका कसा झाला याची उत्तरं प्रेक्षकांना या भागात मिळतात.

दुसऱ्या भागाचं नाव आहे 'Lucifer'! जसकीरतचा हमजापर्यंतचा प्रवास पाहिल्यावर दुसऱ्या भागात वर्तमानकाळात पुन्हा एकदा सिनेमा सुरू होतो. रहेमानच्या ( अक्षय खन्ना ) मृत्यूनंतर उझैर बलोचची भूमिका काय असते? अर्शद पप्पूला तो ल्यारीच्या रस्त्यावर ज्या क्रूरतेने मारतो, त्याचं मुंडकं कापून फुटबॉल खेळतोहा संपूर्ण थरारक सीन आहे. यामध्ये प्रेक्षकांना कल्पनेपलीकडची हिंसा, क्रूरता पाहायला मिळेल. यानंतर हमजा उझैरला प्यादं बनवून कशी सत्ता आपल्या ताब्यात घेणार याचा संपूर्ण प्रवास आदित्य धरने खूपच रंजक पद्धतीने मांडला आहे.

यानंतर सुरू होतो "Ghosts from the Past" म्हणजेच 'धुरंधर २' चा तिसरा भाग. या भागात ल्यारीमध्ये सत्तांतर झाल्याचं पाहायला मिळतं. आता ल्यारीवर ज्याची सत्ता, तोच असतो कराचीचा बादशाह. अर्थात इलेक्शन जिंकल्यावर हमजा अली मजारी होतो कराचीचा नवीन बादशाह. याशिवाय त्याला 'शेर-ए-बलोच' ही पदवी बलोच वासीयांकडून देण्यात येते. याच भागात 'बडे साहब' नेमका कोण आहे? याची मिस्ट्री Solve झालेली आहे.

बडे साहब कोण आहे?

बडे साहब आहे दाऊद इब्राहिम. ही भूमिका नेमकी कोण साकारणार याची बरीच चर्चा सुरू होती. पण, प्रत्यक्ष पाहताना ते थ्रिल इतक्या प्रमाणात जाणवत नाही. कारण, दाऊदच्या भूमिकेपेक्षा इतर कलाकार भाव खाऊन जातात. 'धुरंधर २' मध्ये ही दाऊद इब्राहिमची भूमिका दानिश इकबालने साकारली आहे.

याचदरम्यान हमजाच्या भूतकाळातील पंजाबमधील एक भारतीय व्यक्ती पुन्हा एकदा त्याच्यासमोर येणार आहे. हमजाने या व्यक्तीला बरोबर ओळखलंय. हा माणूस भारतातून ड्रग्जचा व्यापार करण्यासाठी पाकिस्तानात आलेला असतो आणि हमजा हाच जसकीरत आहे ही गोष्ट हा माणूस बरोबर ओळखतो इथेच येईल मोठा ट्विस्ट आणि होईल मध्यांतर. या इंटरव्हल सीननंतर प्रेक्षक खऱ्या अर्थाने होतील डशिशलहश्रशीी. मध्यांतरापर्यंत अनेकदा कथा हळुवार पुढे जातेयकाहीही घडत नाहीये असं बऱ्याचदा वाटू शकतं. पण, दुसरा भाग तेवढाच पटापट पुढे सरकतो. त्यामुळे चार तास कुठेही कंटाळा येत नाही.

'धुरंधर २' चित्रपटाचा चौथा भाग आहे "Trial by Fire" आणि पाचव्या भागात प्रेक्षकांना पाहायला मिळतील पाकिस्तानात दशतवाद्यांचे खून करणारे Unknown Men. या भागात नोटबंदी, जावेद खनानीचा मृत्यू हे मुख्य सीक्वेन्स पाहायला मिळतील. याशिवाय सहाव्या भागात हमजा घेणार आहे बदला The Revenge. यामध्ये मेजर इक्बाल वर्सेस हमजा असा आमनासामना प्रेक्षकांना पाहायला मिळेल आणि मग सुरू होतो The Final Chapter या सिनेमाचा अखेरचा भाग.

दरणवीर सिंह शो!

रणवीर अभिनेता आहे की जादूगारहा प्रश्न प्रेक्षकांना पडू शकतो. कारण, ३ तास ५५ मिनिटांचा हा सिनेमा रणवीरने अक्षरश: स्वत:च्या खांद्यावर उचलून धरलाय असं म्हणायला हरकत नाही. विशेषत: रणवीरचे डोळे तर डायलॉगपेक्षाही खूप काही बोलून गेलेत. संजय दत्त, अर्जुन रामपाल, आर. माधवन या सगळ्यांच्या भूमिका उत्तम आहेतच पण या सगळ्यात कौतुक करायला पाहिजे सारा अर्जुनचं.

रणवीर सिंहने कमाल अभिनय केलायत्याने प्रत्येक गोष्ट किती विचार करुन केलीये, याचा अंदाज चित्रपट पाहिल्यावर येईलच. शेवटच्या एका तासाच सगळी कोडी हळूहळू सुटत जातात. रणवीरचं कौतुक आहेच पण, 'धुरंधर २' पाहिल्यावर एक गोष्ट तुम्हाला निश्चितपणे लक्षात येईल ती म्हणजे, खरा 'धुरंधर' कोणी वेगळाच आहे. आता तो कोण याचा उलगडा थिएटरमध्ये होईलचपण, हा क्लायमॅक्स ट्विस्ट पाहून प्रेक्षक सुद्धा चक्रावून जातील हे नक्की!

-साभार लोकसत्ता

## भाजपाचे वडवणी तालुका सरचिटणीस गणेश जाधव यांचा साळींबा ग्रामस्थांच्या वतीने हृदय सत्कार



वडवणी दि.२१ (प्रतिनिधी):-गणेश जाधव यांची भारतीय जनता पार्टीचे एकनिष्ठ कार्यकर्ते गणेश जाधव यांच्या कार्याची दखल घेऊन भाजपाने त्यांना न्याय देत त्यांच्यावर वडवणी तालुका सरचिटणीस पदी निवड करण्यात आली. निवडीनंतर त्यांचा साळींबा येथे ग्रामस्थांच्या वतीने दांडगा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी साळिंबा गावचे माजी सरपंच अशोक तोगे, उद्योगपती बंडु सवासे, प्रा. ओमप्रकाश जाधव, ग्रा.प. सदस्य बाळासाहेब मायकर, गोवर्धन जाधव, रतन जाधव, ज्ञानेश्वर सवाशे, सुरेश पवार तसेच राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे वडवणी तालुका अध्यक्ष श्री. मधुकर अण्णा ठोसर हे उपस्थित होते.

याविषयी अधिक माहिती अशी की, नुकत्याच भारतीय जनता पार्टी वडवणी तालुका पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या, यामध्ये भाजपाचे एकनिष्ठ व प्रामाणिकतेने काम करणारे सच्चे कार्यकर्ते गणेश जाधव यांची वडवणी तालुका सरचिटणीस पदी निवड करण्यात आली, निवडीनंतर जन्मभूमीत त्यांचा ग्रामस्थांच्या वतीने हृदय सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांसमोर मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष, जिल्हा अध्यक्ष, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष यांनी माझ्यावर जो विश्वास दर्शवत मला मोठी जबाबदारी दिली त्या जबाबदारीचा उपयोग मी सर्वसामान्यांच्या कल्याणाकरिता करीन जनतेचे कामे मार्गी लावण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करीन, माझ्यावर विश्वास दर्शवला त्या विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही, भविष्यात होणाऱ्या निवडणुकीमध्ये वडवणी तालुक्यातून भाजपाला मोठे यश मिळवून देण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करीन. तसेच वडवणी तालुक्यात भारतीय जनता पार्टीचा विस्तार करण्यासाठी कार्यकर्त्यांची नोंदणी करण्यासाठी मी अहोरात्र मेहनत घेईल असा विश्वास व्यक्त केला.

# होर्मुझवरुन २२ देश आक्रमक, इराणविरोधात संताप व्यक्त

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसेवा):- जगातील २२ देशांनी इराणविरोधात मोर्चा उघडला आहे. आखाती प्रदेशात वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर युएई, अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स यांसारख्या देशांनी एक संयुक्त निवेदन जारी केले आहे. या निवेदनात इराणच्या हल्ल्यांना जागतिक शांतीसाठी मोठा धोका म्हटले आहे. या देशांनी स्पष्ट केले आहे की, इराणची मनमानी आता सहन केली जाणार नाही. होर्मुझ सामुद्रधुनीत जहाजांना लक्ष्य करणे संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेला नुकसान पोहोचवित आहे.

होर्मुझ सामुद्रधूनीमध्ये सर्वाधिक तेल पुरवठा होतो. इराणने अलीकडे व्यापारी जहाजे आणि तेल पाइपलाइनला लक्ष्य केले आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने याला सागरी सुरक्षेचे उल्लंघन मानले आहे. संयुक्त निवेदनात म्हटले आहे की, इराणला आपल्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांच्या धमक्या तात्काळ थांबवण्याची गरज आहे. या तणावात वाढ झाली, तर याचा परिणाम जगातील सर्वात गरीब आणि कमजोर लोकांवर अधिक होईल. इराणवर आरोप आहे की, इराणकडून होर्मुझच्या मार्गावर बंदी आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्याने ड्रोनद्वारे जहाजावर हल्ला केले आहे. युएन सुरक्षा परिषदेचा प्रस्ताव २८१७ चा संदर्भ देत या देशांनी म्हटले आहे की, हा आंतरराष्ट्रीय गुन्हा आहे. सागरी नेव्हिगेशनची मुभा एक मूलभूत अधिकार आहे, ज्याला हिरावून घेतले जाऊ शकत नाही. इराणच्या कृत्यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळी पूर्णपणे बिघडू शकते.

२२ देश

संयुक्त अरब अमिराती, युनायटेड किंगडम, फ्रान्स, जर्मनी, इटली, नेदरलँड्स, जपान, कॅनडा, दक्षिण कोरिया, न्यूझीलंड, डेन्मार्क, लाटविया, स्लोव्हेनिया, एस्टोनिया, नॉर्वे, स्वीडन, फिनलंड, झेकिया, रोमानिया, बहरीन, लिथुआनिया, ऑस्ट्रेलिया

या होर्मुझ संकटाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेने मोठे पाऊल उचलले आहे. आयईएने आपात्कालीन तेल आरक्षित बाजारात आणण्याचा निर्णय घेतला आहे. २५ देशांच्या गटाने म्हटले आहे की, ते तेलाच्या किमती नियंत्रित ठेवण्यासाठी उत्पादन वाढविण्यावर काम करत आहेत. ते इतर उत्पादक देशांसोबत मिळून ऊर्जा बाजार स्थिर करण्याचा प्रयत्न करत आहेत. याचे उद्दिष्ट म्हणजे इराणच्या ब्लॅकमेलिंगमुळे जगाची अर्थव्यवस्था थांबू नये.

सर्व देशांनी एकत्र येऊन म्हटले आहे की, ते होर्मुझच्या मार्गाला सुरक्षित ठेवण्यासाठी सर्व शक्य प्रयत्न करतील. यासाठी समुद्री सुरक्षा आणि मुक्त नेव्हिगेशन सुनिश्चित करण्याची तयारी केली जात आहे. निवेदनात स्पष्ट केले गेले आहे की, या सुरक्षा योजनेमध्ये सामील होण्यासाठी कोणत्याही देशांचे स्वागत आहे. तसेच प्रभावित देशांना आर्थिक मदत देण्यासाठी IFI आणि युनाइटेड नेशन्ससह काम केले जाईल.

पान १ वरून

## डॉ.ज्योती मेटेंना अध्यक्ष करा...

स्वेच्छानिवृत्तीनंतर त्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय झाल्या असून सध्या शिवसंग्राम पक्षाचे नेतृत्व करत आहेत. डॉ.मेटे यांच्याकडे असलेला दीर्घ प्रशासकीय अनुभव, कायदेशीर जाण आणि सामाजिक कार्याची पार्श्वभूमी लक्षात घेता त्यांची महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यास या पदाची गरिमा राखली जाईल आणि महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी काम होईल, असा विश्वास जनतेतून व्यक्त होत आहे.

## एजाज देशमुख यांचे निधन

प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली.

संघटनात्मक बांधणीमध्येही त्यांचा मोठा वाटा होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय म्हणून एजाज देशमुख महाराष्ट्र भाजपातच नव्हे तर केंद्रीय भाजपातही त्यांची ओळख निर्माण झाली होती. महाराष्ट्र राज्य हज कमिटीचे सदस्य म्हणून त्यांनी हज यात्रेच्या नियोजनात, मार्गदर्शनात आणि सुविधांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. हज यात्रेकरूंना मार्गदर्शन करणारे शिबिरे, माहिती सत्रे आणि विविध उपक्रमांद्वारे त्यांनी कार्य केले होते.

त्यांच्या निधनाची बातमी समोर येताच राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांकडून शोक व्यक्त करण्यात येत आहे. अनेकांनी सोशल मीडियावरून श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या कार्याचा उल्लेख केला आहे. एजाज देशमुख हे संयमी, अभ्यासू , एकनिष्ठ आणि सर्वसमावेशक नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. विविध धर्मीयांमध्ये सलोखा राखत त्यांनी समाजकार्य केले. त्यांच्या निधनामुळे एक अनुभवी आणि लोकाभिमुख नेतृत्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. देशमुख कुटुंबियांच्या दुःखात दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकाराने **१) श्री.अतुल श्रीनिवास जाजू २) श्री.विपुल श्रीनिवास जाजू ३) नम्रता सागर नावंदर ४) श्री.रामबीलास मारोतीराव जाजू** यांचे मालकीची व ताब्यात असलेली मौजे चकलांबा, ता.गेवराई जि.बीड येथील गट क्रमांक ३८९ मधील क्षेत्र ४ हेक्टर ८५ आर जमीन, गट क्रमांक ३९०/२ मधील क्षेत्र ० हेक्टर ०२ आर जमीन, गट क्रमांक ३९०/३ मधील क्षेत्र ० हेक्टर ०२ आर जमीन, गट क्रमांक ३९१ मधील क्षेत्र ५ हेक्टर २५ आर जमीन व गट क्रमांक ४५२ मधील क्षेत्र ० हेक्टर ३५ आर जमीनी पैकी गट नंबर ३८९ व ग.नं.३९१ ची एकत्रीत चतुर्सिमा : पुर्वेस - नदी, पश्चिमेस - माळी व खेडकर यांची ग.नं.८८ व ग.नं. ४५ मधील जमीन, दक्षिणेस - चोपडे, छाजेड व चंदाबाई यांची ग.नं.४१५, ४२४, ४२५, ४२६ व ४२७ मधील जमीन व उत्तरेस - श्री.पोपटशेठ व श्री.सुभाषशेठ छाजेड यांची ग.नं.४५८ मधील जमीन तसेच गट नंबर ४५२ जमिनीची चतुर्सिमा : पुर्वेस - बालमटाकळी रस्ता, पश्चिमेस - श्री.महादेव व श्री.बाळू खेडकर यांची ग.नं.३९४ मधील जमीन, दक्षिणेस - श्री.जिजा खेडकर यांची ग.नं.४५१ मधील जमीन व उत्तरेस अलताफ व त्यांचे भाऊ यांची ग.नं.४५३ मधील जमीन येणे प्रमाणे चतु:र्सिमे अंतर्गत येणाऱ्या जमिनी त्यामधील झाड झुडूप, दगड मातीव तदंगभुत वस्तुसह माझे पक्षकाराने कायम खरेदी करण्याचा व्यवहार केला आहे. विक्रे त्याने सदर जमिनी संपूर्णपणे निर्विवाद, निर्जोखमी व बोजा विरहीत असल्याची खात्री दिलेली आहे. या उपर सदर जमिनीमध्ये जर कोणाचे काही हक्कसंबंध जसे की ईसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, आममुखत्यारपत्र इत्यादी स्वरुपाचे हक्क व अधिकार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसाचे आत खालील पत्त्यावर योग्य त्या पुराव्यासह आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा काही आक्षेप आला नाही तर सदर जमिनी या निर्विवाद, निर्जोखमी व बोजा विरहीत आहे असे समजुन सदर जमिनीचे खरेदीखत माझे पक्षकार करुन घेतील. त्यानंतर कोणाचाही कसलाही आक्षेप चालणार नाही. करीता हे जाहीर प्रगटन.

बीड

– जाहीर प्रगटन देणार –

**ॲड.विजयकुमार मोतीलाल कासट**

**रा.कासट कॉम्प्लेक्स, सुभाष रोड, बीड.**

**मो.नं.९४२२७४१०९१**

12994


## मुर्शदपूरमध्ये लेप काढला अन्...

युवक कावडीने शहागडवरुन पाणी आणून मुर्तीला अभिषेक करतात. सकाळी सुर्योदयाला जन्म आणि संध्याकाळी शेरणी वाटपाचा कार्यक्रम असतो. नंतर झेंड्याची मिरवणूक असते. साधारण दीड हजार लोकवस्तीचे हे गाव आहे, अशी माहिती गावचे ग्रामस्थ ओमराजे जगताप यांनी दिली.

## भारतात एलपीजीचा पुरवठा सुरळीत...

वाटपात ५० टक्क्यांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे हॉटेल इंडस्ट्रीला मोठा दिलासा मिळणार आहे.

केंद्र सरकारने काय घोषणा केली?

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने आज व्यावसायिक एलपीजी ग्राहकांसाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने राज्यांच्या व्यावसायिक गॅसच्या कोट्यात २० टक्क्यांनी अतिरिक्त वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच केंद्रशासित प्रदेशांना होणारा गॅसचा पुरवठा ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. २३ मार्च पासून हा निर्णय लागू असणार आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या या निर्णयाचा व्यावसायिक गॅसच्या ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

## बीडमध्ये कुबेर का खजाना...

नियोजनासाठी व यशस्वी अंमलबजावणीसाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी सौ. सारिका अग्रवाल, सौ. शांता गिल्डा, सौ.सविता सारडा, सौ. मधु कोटेचा, सौ.सुनीता सारडा, सौ.अर्चना मुंदडा, सौ.अनुश्री लड्डा व सौ.अनुराधा लड्डा यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यासह शहर व परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या प्रेरणादायी परिसंवादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे संयोजन एन.आर.एस.पी. परिवार, बीड यांनी केले आहे.

## विकृत कॅप्टनची ७ तास चौकशी...

समोरासमोर चौकशी करण्यात आली.

या चौकशी दरम्यान कॅप्टन खरात आणि नीरज जाधवमध्ये शाब्दिक खडाजंगी झाल्याची सूत्रांची माहिती आहे. अशोक खरातचे राजकीय संबंध, तसेच व्यावसायिक मालमत्ता यांची देखील चौकशी करण्यात येत आहे.

दरम्यान, या तपासात नव्या घडामोडी समोर येत असून, दीपक केसरकर यांचे निकटवर्तीय दीपक लोंढे यांचीही कसून चौकशी करण्यात आली आहे. लोंढे आणि अशोक खरात यांच्यात काही ठिकाणी व्यावसायिक संबंध असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. विशेषतः सिन्नर परिसरात जमीन खरेदी-विक्रीच्या व्यवहारांत लोंढे सक्रिय असल्याची माहिती पुढे आली आहे.

## मुख्यमंत्र्यांनी घोषीत केलेला विमा द्यावा...

शेतकऱ्याच्या मनात आहे. यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ जिल्हाधिकारी साहेबांमार्फत मुख्यमंत्री साहेबांना निवेदन देणार आहे.

शेतकऱ्यांना जाहीर केलेले हेक्टरी १७००० विम्याचा लाभ तात्काळ देण्यात यावा. जर लवकरात लवकर शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळाला नाही, तर भाई गंगाभीषण थावरे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने बीड जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायत समोर लाक्षणिक आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा देण्यात आला होता.

## जिल्हा पोलीस दलात सीसी टीव्ही मोबाईल व्हॅन

जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावतपूर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्यांदाच पाचेगाव येथे या व्हॅनचा वापर वापर करण्यात आला.

पान ६ वरून

## अंबाजोगाईचे सुपुत्र तथा सर्वोच्च न्यायालयाचे

पदे भूषवली. मार्च १९९६ ते जानेवारी २००० या काळात त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून कार्य केले. त्यापूर्वी जानेवारी १९९४ ते मार्च १९९६ दरम्यान त्यांनी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून जबाबदारी सांभाळली होती. तसेच १९७८ ते १९९४ या प्रदीर्घ काळात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून न्यायदानाचे कार्य केले. विशेष म्हणजे, जुलै ते सप्टेंबर १९९४ या कालावधीत त्यांनी पंजाबचे प्रभारी राज्यपाल म्हणूनही कार्यभार पाहिला होता. केवळ न्यायव्यवस्थाच नव्हे, तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. अंबाजोगाई येथील नामांकित योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले होते. निवृत्तीनंतरही कायद्याप्रती असलेली त्यांची निष्ठा कायम होती आणि त्यांनी अखेरच्या टप्प्यापर्यंत आपले योगदान सुरू ठेवले होते. त्यांच्या निधनाने देशाने एक अभ्यासू, अनुभवी आणि निष्कलंक चारित्र्याचा कायदेतज्ज्ञ गमावला असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## गेवराई शहरात विश्वशांतीसाठी दुवा

शरद पवार राष्ट्रवादी पक्षाचे नेते राजेंद्र मोटे, अण्णासाहेब राठोड, किशोर कांडेकर, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, उपाध्यक्ष दादासाहेब गिरी, ऋषिकेश बेदरे, संजय काळे, पप्पू गायकवाड, अमोल करांडे, जालिंदर पिसाळ, दादासाहेब घोडके, नगरसेवक आप्पासाहेब कनगुडे, यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, नगरसेवक, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ईदच्या या पवित्र प्रसंगी समाजात बंधुभाव, एकता आणि सौहार्द टिकवण्याचा संदेश देण्यात आला. नमाज आणि दुवामुळे परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.

## माजलगांव राजस्थानी मंगल कार्यालयाने

केले आहे.मार्च एंड असल्यामुळे माजलगाव नगर परिषदेच्या वतीने मुख्याधिकारी सुंदर बोंदर व सर्व कर्मचारी स्वतः हा शहरांमध्ये फिरून कर वसुली करत आहेत नागरिकांच्याही काही समस्या असतील तर त्या नगरपरिषद कामकाजाच्या वेळेमध्ये येऊन संपर्क करून आपल्या समस्या सोडून घ्याव्यात असे आव्हान त्यांनी केले आहे शहरांमध्ये नगरपरिषदेची वसुली मोहीम सुरू असून माजलगाव च्या राजस्थानी मंगल कार्यालया कडील मालमत्ता कर रुपये ४५०,००० एक रकमी वसूल करण्यात आला त्यावेळी स्वतः मुख्याधिकारी सुंदर बोंदर हजर होते त्यांनी मालमत्ता कर भरणा केल्याबद्दल राजस्थानी मंगल कार्यालयाचे अध्यक्ष बालकिशन इंदानी यांचा सत्कार केला त्यावेळी राधेश्याम लोहिया कार्यालयीन अधीक्षक आयुब पठाण वसुली लिपिक चंद्रकांत बुलबुले, सुमित साळवे वसुली सहाय्यक रंजीत रोमन शंकर चव्हाण इत्यादी कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते. तसेच वसुली कामामध्ये स्वतः मुख्याधिकारी यांनी लक्ष घालून मोठाले थकबाकीदार यांना भेटी देऊन कराचा भरणा करण्याबद्दल विनंती केली तसेच कराचा भरणा न केल्यास मालमत्ता सील करण्याची तंबी दिली.

## हिंदु समाजाच्या संघटनांनी एकत्र येण्याची गरज–महंत गौरीशंकर गिरी

उपस्थितांना संबोधित केले तसेच मार्गदर्शक म्हणून ज्ञानेश्वरजी कोंडावार यांनी हिंदू समाजाची एकता, संस्कृतीचे जतन आणि सामाजिक बांधिलकी यावर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांनी उपस्थितांमध्ये नवी ऊर्जा आणि जागर निर्माण झाला. वक्त्यांनी हिंदू समाजाच्या संघटनाची गरज अधोरेखित करत, भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद देत वातावरण भारावून टाकले. कार्यक्रमानंतर भगवान सिद्धेश्वरची महाआरती व महाप्रसादाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

## धारूरचा घाट बनला मृत्यूचा सापळा

तातडीने रुग्णालयात दाखल केले.जखमींवर अंबाजोगाई येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## गेवराई येथील अंबाजोगाई पिपल्स बँकेत

बँकेच्या फेऱ्या माराव्या लागतात. कर्ज प्रकरणांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त कागदपत्रे मागणे किंवा किरकोळ त्रुटींवर आक्षेप घेऊन प्रकरण लांबणीवर टाकले जात असल्याचे बोलले जात आहे. कर्ज प्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव आणि संवादातील विलंब यामुळे खातेदारांमध्ये बँकेप्रती तीव्र नाराजी निर्माण होत असल्याचे बोलले जात आहे. या प्रकारांमुळे सामान्य नागरिकांना वेळेवर कर्ज उपलब्ध होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर पापा मोदी यांनी याप्रकरणी गांभीर्याने दखल घेऊन ग्राहकांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी खातेदार ग्राहकांनी केली आहे.

## रूपाली चाकणकरांना सहआरोपी करून अटक करावी–गणेश वरेकर

करत खालील मागण्या मांडल्या आहेत: सह-आरोपी म्हणून गुन्हा नोंदवा: भोंदूबाबा अशोक खरात याच्या कृत्यांना राजकीय पाठबळ असल्याचा संशय व्यक्त करत, या प्रकरणात रूपाली चाकणकर यांची भूमिका संशयास्पद असल्याने त्यांना सह-आरोपी करावे. पक्षातून हकालपट्टी: राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्वेसर्वा सुनेत्रा वहिनी पवार यांनी रूपाली चाकणकर यांचा तातडीने महिला प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा घेऊन त्यांची पक्षातून हकालपट्टी करावी. निष्पक्ष चौकशी: या प्रकरणात राजकीय नेते असण्याची शंका असल्याने निष्पक्ष चौकशी केली तर मोठे मोठे मासे गळ्याला लागतील त्या मुळे आरोपी मग तो सत्ताधारी पक्षातील असो वा विरोधक, कोणाचीही गय न करता कडक कारवाई व्हावी. गणेश वरेकर यांनी बोलताना म्हटले आहे की, राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. सातारा जिल्ह्यातील गाजलेले वडवणी तालुक्याची लेक मुलगी डॉ. संपदा मुंडे प्रकरण असो किंवा इतर महिला अत्याचार, या सर्व प्रकरणांत महिलांना न्याय देण्याऐवजी केवळ राजकीय हितसंबंध जोपासण्याचे काम झाले आहे. महिला आयोगाच्या पदावर असतानाही अनेक गंभीर प्रकरणांत जातीने लक्ष दिले गेले नाही. उलट, काही प्रकरणांत आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न करुन महिलांच्या बाबतीत जाणीव पुर्वक दुर्लक्ष केले. तर काही प्रकरणात महिलांना न्याय देण्या ऐवजी आरोपींना पाठिशी घालण्याचे पाप रुपाली चाकणकरांनी केले आहे.त्यामुळे आता मुख्यमंत्र्यांनी व उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून पारदर्शक चौकशीचे आदेश द्यावेत, असे वरेकर यांनी नमूद केले आहे. आता राज्य सरकार आणी पोलीस प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ४ हजार किलोमीटरवरील 'डिएगो गार्सिया' हवाई तळावर डागल्या मिसाईल्स

या हल्ल्यामुळे अमेरिका-इस्त्रायललाही धक्का बसला आहे. कारण एवढ्या लांब अंतरावर इराण हल्ला करेल याचा अमेरिका किंवा इस्त्रायलने विचारही केला नसेल. इराणने ब्रिटन आणि अमेरिकेच्या हवाई तळांवर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांमुळे इस्त्रायल हादरला आहे. यावरून इराणच्या क्षेपणास्त्र क्षमतेबद्दल इस्त्रायललाही धक्का बसला आहे. कारण इराणच्या क्षेपणास्त्रांचा पल्ला किती लांबपर्यंत आहे हे अद्याप अधिकृतपणे समोर आलेलं नाही. इराणने डिएगो गार्सिया हवाई तळावर केलेल्या हल्ल्यानंतर इस्त्रायलने तेहरानवरील हल्ले आणखी वाढवण्याची धमकी दिली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

## युद्धादरम्यान पंतप्रधान मोदींचा इराणच्या अध्यक्षांना फोन

यांनी या संवादाची माहिती एक्सवर शेअर केली आहे. ते म्हणाले, इराणचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मसूद पेझेश्कियान यांच्याशी संवाद साधला आणि त्यांना ईद व नवरोजच्या शुभेच्छा दिल्या. या सणाच्या काळात पश्चिम आशियात शांतता, स्थैर्य आणि समृद्धी नांदो अशी आशा पंतप्रधान मोदींनी व्यक्त केली.

## सदाशिव पेठेत औषध दुकानातून पावणेतीन लाखांची रोकड चोरी

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदाशिव पेठेतील भरत नाट्य मंदिरासमोर तक्रारदार औषध वितरकाचे दुकान आहे. गुरुवारी (१९ मार्च) सायंकाळी दुकान बंद करण्यात आले. चोरट्यांनी मध्यरात्री दुकानाचे कुलूप तोडले. गल्ल्यातील दोन लाख ८२ हजारांची रोकड चोरून चोरटे पसार झाले. शुक्रवारी (२० मार्च) सकाळी नेहमीप्रमाणे दुकान उघडल्यावर चोरीचा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती मिळताच विश्रामबाग विभागाचे सहायक पोलीस आयुक्त चंद्रकांत भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप कसबे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी दुकानाच्या परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले असून, चोरट्यांचा शोध घेण्यात येत आहे. सहायक पोलीस निरीक्षक उमेश कारके तपास करत आहेत. शहर परिसरात गेल्या काही महिन्यांपासून दुकानांचे कुलूप तोडून रोकड चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. औषधविक्री, मद्यविक्री, तसेच किराणा माल दुकानांचे कुलूप तोडून गल्ल्यातील रोकड चोरीचे प्रकार वाढले आहेत

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.

AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक २२ मार्च २०२६ पान -३

## संबोधी भालेराव नवोदय विद्यालय प्रवेशास पात्र झाल्याबद्दल सत्कारित

केज दि २१ (प्रतिनिधी) केज तालुक्यातील माळेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची विद्यार्थीनी संबोधी किशोर भालेराव ही जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा देऊन प्रवेशास पात्र ठरली आहे या यशाबद्दल अक्षर परिवाराचे विष्णू यादव, महादेव ढाकणे, विक्रम डोईफोडे, गीता अंडील, युवराज हिरवे, डॉ. हनुमंत सौदागर, बिभीषणमोहिते, सतीश देशमुख, विनायक आवाड, अण्णा कदम, तुषार पाटील, दया खोपे, जयदीप देशमुख, प्रकाश कांबळे, प्रशांत कांबळे, एच.के. कांबळे, बाळासाहेब बचूटे, महादेव कांबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## कमलबाई पांडूरंग पौळ यांचे निधन



किल्ले धारूर दि २१(प्रतिनिधी)- केज तालूक्यातील मोठेगाव येथील कमलबाई पांडूरंग पौळ वय ७६ वर्ष यांचे हृदयविकाराचे झटक्याने बुधवारी रात्री निधन झाले त्यांच्या निधना मुळे सर्वत्र दुःख व्यक्त केले जात आहे.मोठेगाव ता. केज येथील कमलबाई पांडूरंग पौळ यांना बुधवार दि १८ मार्च रोजी रात्री अचानक हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थीहावर दि.१९ मार्च रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, मुलगी, सुना नातवंडे असा परीवार आहे .त्यांच्या आकस्मित निधनाने सर्वत्र दुःख व्यक्त केले जात आहे .त्या धारूर येथील सेवानिवृत्त शिक्षक बाबुराव शिनगारे (गुरूजी) यांच्या बहीण होत्या.

## अवकाळीच्या धास्तीने रब्बी हंगामातील पिकं काढणीला वेग
## मजूर व मळणीसाठी यंत्र मिळत नसल्याने शेतकरी हतबल

बीड दि २१ (प्रतिनिधी) - गेली दोन-चार दिवसांपासून बीड जिल्ह्यामध्ये काही भागात सोसाट्याचा वारा व मेघगर्जनेसह गाराचा पाऊस पडण्याच्या घटना घडू लागल्या. यामुळे काही शेतकऱ्यांचे नुकसान झाले. तर यापेक्षा जास्त आपलं ही नुकसान होऊ नये म्हणून अवकाळीच्या धास्तीने शेतकऱ्यांनी गहू आणि हरभरे काढणीला वेग दिला असल्याचे चित्र पाहायला मिळते. परंतु मजूर आणि मळणीसाठी यंत्र वेळेत मिळत नसल्याने शेतकरी हातबल झाल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. शेतमजुरांना मागील तेवढा रोजगार देण्याचे धाडस करून देखील मजूर मिळत नसल्याने शेवटी शेतकऱ्याचे कुटुंब घरच्या घरी काढणीवर जास्त भर देताना दिसून येऊ लागले आहेत.

गतवर्षीच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे खरीप पिक गेले. परंतु न डगमगता शेतकऱ्यांनी रब्बी हंगामावर जास्त भर देण्यात आला . कित्येक शेतकऱ्यांनी लवकरच रब्बी हंगामातील पेरणी केल्याने त्यांच्या शेतातील गहू हरभरा ज्वारी आदी पिकाची काढणी झाली तर उशिरा पेर झालेली रब्बी पिके काढणीला आली आहेत. यातच दोन-तीन दिवसापासून बीड जिल्ह्यामध्ये काही भागात वादळी वाऱ्यासह गाराचा पाऊस झाला. यामुळे काढून ठेवलेल्या पिकाच्या गंजी भिजल्या गेल्या तर काढणीस आलेल्या पिकाने लोळण घेतली. गाराच्या पावसामुळे फळबागाचे देखील काही ठिकाणी नुकसान झाल्याचे सांगण्यात येते. आणखीन आभाळ स्वच्छ नाही. दररोज कुठे ना कुठे पावसाच्या सरी कोसळत असल्याचं सांगण्यात येते. तर आभाळ भरून आलेलं देखील पाहायला मिळतं यामुळे शेतकरी वर्ग या अवकाळीच्या धास्तीने पीक काढण्यासाठी लगबग करू लागला असला तरी पाहिजे तेवढा रोजगार देऊन देखील मजूर मिळेनात तसेच सर्वांनी एकच घाई केल्याने मळणी यंत्र देखील उपलब्ध होईनात. त्यामुळे हतबल झालेला शेतकरी वर्ग आपल्या कुटुंबातील लहान पोरापासून थेट वृद्धापर्यंत शेतावर राबताना दिसू लागला आहे. विशेष म्हणजे रब्बीचे ज्वारी गहू हरभरा ही पीक काढण्यासाठी मजुराची टंचाई भासत असताना ऊस तोडणी साठी गेलेले कित्येक गावचे ऊसतोड कामगार वापस आले. परंतु रब्बी हंगामातील पिकांच्या काढणीसाठी मात्र त्यांनी अद्याप घर सोडलेले दिसून येत नसल्याने मजुराची मोठ्या प्रमाणात टंचाई भासू लागली असल्याचं शेतकरी वर्ग आहे. यातच पाडवा सण झाला परंतु अवकाळीच्या भितिने



मनासारखा सण शेतकऱ्यांना साजरा करता आला नसल्याची खंत एका शेतकऱ्याने व्यक्त केली. मोठ्या प्रयत्नाने व कष्टाने पीक आले, परंतु काढणीच्या वेळेस अवकाळीन गुण दाखवायला सुरुवात केल्याने नुकसान होण्याची भीती शेतकरी वर्गात व्यक्त केली जाऊ लागली आहे. दुसरीकडे गाराचा आणि वाऱ्याचा पाऊस झाला तर आंब्याच्या झाडाला जे काही फळ लागले आहे ते देखील झडले जाईल, अशी भीती देखील व्यक्त केली जात आहे .एकूणच शेतकऱ्यामागील निसर्गाचा ससेमिरा सुटायला तयार नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे येत आहे.

## नारायणगड संस्थानच्या पाणीपुरवठा योजनेच्या पाईप लाईन कामाची आमदारांनी केली पाहणी

कोळगाव, दि.२१ (प्रतिनिधी )- श्री क्षेत्र नारायणगड संस्थान च्या वतीने विविध प्रकारचे विकासकामे गडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली प्रगतीपथावर सुरू आहे. दरम्यान नारायणगड संस्थान च्या पाणीपुरवठा योजनेच्या पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईनची आ. संदीप क्षीरसागर यांच्याकडून दि.१९ मार्च रोजी पाहणी केली. गडावर पाणी टंचाई होवू नये या अनुषंगाने पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याच्या टाकी आणि पाईप लाईन ची कामे नवगण राजूरी, शिरापुर शिवारात प्रगती पथावर सुरू आहे. डोंबरी उकंडा साठवण तलाव ते शिरापुर शिवारातून नवगण राजूरी काटवटवाडी फाटा बेलुरा मार्गे नारायणगड अश्या या पाईप लाईन कामाची पाहणी आ. संदीप क्षीरसागर यांच्याकडून गुडी पाडव्याच्या निमित्ताने केली .तसेच उपस्थित परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी सरपंच सुरेश बनकर, उपसरपंच भगवान आण्णा बहिर, शहादेव बहिर, अनिल बनकर, पत्रकार बाळासाहेब घाडगे, अविनाश गवळी, गणेश जाधव ,भगवान काशिद, बाळासाहेब गवळी,अमोल बहिर, भुषण ससाणे, दत्ता गवळी रामचंद्र बहिर, आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## अंमळनेर येथे गोविंद गाडे यांच्या इफ्तार पार्टीला हिंदू- मुस्लिम बांधवांची उपस्थिती

पिंपळवंडी दि. २१ (प्रतिनिधी) - पाटोदा तालुक्यातील अंमळनेर येथील ग्रामपंचायतच्या वतीने सरपंच पुत्र गोविंद गाडे यांनी अंमळनेर ग्रामपंचायतच्या प्रांगणात बूधवार दि.१८ रोजी दिलेल्या दावत ए ईफ्तार पार्टीच्या मेजवानीला हिंदू-मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी सरपंच पुत्र गोविंद गाडे यांनी ईफ्तार पार्टीला आलेल्या हिंदू- मुस्लिम बांधवांचे स्वागत केले.तसेच सरपंच गोविंद गाडे व उपस्थित मान्यवर व्यक्तींचा मुस्लिम बांधवाकडून सन्मान संपन्न झाला.या कार्यक्रमाला कादरभाई तांबोळी, हुसेन तांबोळी साहेब,सत्तार भाई आतार,इम्रान पठाण,शफीकभाई इनामदार,अमीर इनामदार,अहमद पठाण,तनवीर इनामदार,ईलीयास तांबोळी,सलमान



आतार,शौकत बागवान,सय्यद मुन्ना,सय्यद अमन, फिरोज बागवान,मोहसीन बागवान, मा.सरपंच सुभाष पोकळे सह महावीर पवार,सतीश पवार, सोमनाथ गाडे सर,आप्पा कांबळे, कैलास पवार,मंगेश कदम,राजेंद्र पोकळे,सी.बी.पोकळे,तलाठी वैजनाथ येवले,सोमा पांगरे,महेश रुद्रके,गौतम नहार,महेश खेंगरे, नितीन घोशीर,प्रकाश गाडे,सतीश मिसाळ,हरिभाऊ गाडे,राम गाडे, विष्णू गाडे,किरण गाडे,सचिन बर्डे, पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार आदीसह परिसरातील आजी-माजी सरपंच ग्रा.प.सदस्य, चेअरमन व ग्रामस्थ उपस्थित होते.



राजूरी नवगण - बीड तालुक्यातील नवगण राजुरीच्या पोलीस पाटीलपदी अभिजीत गणेश टेके यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना आ. संदीप क्षीरसागर, उपसरपंच भगवान बहिर, सुरेश बनकर, ज्ञानेश्वर बहिर, रामचंद्र बहिर, उत्तम गवळी, अमोल बहिर, विनोद पवार आदि.

## एस आय आर मॅपिंग विशेष मोहिमेचा कालावधी वाढवा-प्रा.बबनराव आंधळे

बीड दि २१ (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्यामध्ये एस आय आर मॅपिंग चे काम सुरू आहे. या सर्वे मधील विविध समस्या संदर्भात शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांची भेट घेऊन दिलेल्या निवेदनात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी बीड यांचे आदेश जा. क्र २०२६/ पुननिरीक्षण/ सीआर/कावि ९४ दि- २/३/२०२६ उपरोक्त संदर्भीय विषयांवर सविनय कळविले की ऑक्टोबर २०२४ च्या मतदार यादी मध्ये असलेले मतदार सन २००५ रोजीच्या मतदार यादीमधील मतदाराशी मतदार मॅपिंग करणे, मतदार यादीतील नोंदी अद्यावत करणे, नोंदीची पडताळणी करणे इत्यादी कामकाजासाठी बी एल ओ यांना दिनांक १०/३/२०२६ ते २०/३/२०२६ या कालावधीत पूर्ण वेळ कामाकरिता कार्यमुक्त करून बी एल ओ ला सदरील काम कर्तव्यदक्षपणे करण्याचे आदेश आहेत. वोटर टू वोटर मॅपिंगचे काम प्रगतीपथावर असले तरी प्रोजेनी मॅपिंगचे काम प्रलंबित आहे. प्रोजनी मॅपिंगसाठी महिलांची माहेरकडील माहिती मिळवण्यासाठी लागणारा वेळ व माहिती उपलब्धतेचे मर्यादित स्त्रोत यामुळे बीड जिल्ह्यातील प्रोजनी मॅपिंगचे काम विहित वेळेत पूर्ण होत नाही. सदर काम पूर्ण करण्यासाठी जिल्ह्यातील बी एल ओ यांना विशेष मोहिमेचा कालावधी पुढील दिवसासाठी अजून वाढवून देणे गरजेचे आहे. करिता मॅपिंग विशेष मोहिमेचा कालावधी वाढवून देण्यात यावा तसेच जे बीएलओ काम चुकारपणा करत आहेत अशांना सक्तीचे समज द्यावी अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.

## गेवराईच्या जि.प.कन्या शाळेला आदर्श शाळा पुरस्कार

गेवराई,दि२१ (प्रतिनिधी)- ध्येय एज्युकेशन फाऊंडेशन ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रात राज्यस्तरावर उल्लेखनीय आदर्श निर्माण करणाऱ्या विद्या मंदिरांचा सन्मान सोहळा राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कार गेवराई येथील जिल्हा परिषद कन्या शाळेला जाहीर करण्यात आला.

गेवराई शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असणारी जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा ही एक गेवराई शहरासाठी भुषनावह अशी वास्तू आहे.इथे आजपर्यंत हजारो ग्रामीण आणि शहरी भागातील मुली सुशिक्षित,साक्षर होऊन गेल्या.खाजगी संस्थांच्या अनेक शाळां आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांसोबत शैक्षणिक स्पर्धा करत गुणवत्ता टिकविण्यात यशस्वी ठरत आहे.संस्कारा सोबत शाळेत शिक्षणाचे आणि नैतिकतेचे धडे देत देत विद्यार्थी - विद्यार्थिनींच्या कलागुणांना प्रोत्साहन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सर्वच शिक्षकवृंद धडपडत असतात. नुकत्याच झालेल्या दहावीच्या परीक्षा कॉपीमुक्त अभियान राबवत सिसिटीव्ही कॅमेऱ्याच्या सहाय्यानं सुरळीत पार पडल्या. शाळेच्या प्रगतीचा आलेख उंचावत ठेवण्यासाठी शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक विष्णू सोळुंके यांचे खुप मोठे योगदान आणि मार्गदर्शन आहे.अनेक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यीनींनी सहभाग घेऊन भरघोस बक्षिसे मिळवली. शालेय परिपाठ, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, वर्ग सूशोभिकरण, जयंतीनिमित्त भाषणे, प्रबोधनपर नाटीका,बाल कवी काव्यवाचन मुलींची स्वयं शिस्त तसेच शैक्षणिक प्रगती या सर्व निकषांवर खरं उतरत शाळा राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कारसाठी पात्र ठरली आहे. दि.२९ मार्च २०२६ रविवार रोजी पुणे येथे भव्य समारंभात ग.दी.माडगुळकर नाट्य गृह निगडी पुणे येथे सकाळी ९ वाजता या पुरस्काराचे वितरण होणार आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शिक्षकबधु भगीनींसह शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारीसह विद्यार्थ्यीनिमधे आनंद आणि उत्साह वाढला आहे.सर्व स्तरातून शाळेवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## बीड लोकन्यायालयात ॲड.मुंडे यांनी तडजोड करून अपघातग्रस्ताच्या वारसाना मिळवून दिले ७० लाख रु.

बीड दि २१ (प्रतिनिधी) -एचडीएफसी एरगो जनरल इन्शुरन्स कंपनीतर्फे अपघातात मृत्यू झालेल्या



युवकाच्या वारसांना तब्बल ७० लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्यात आली आहे. ही तडजोड मोटार अपघात प्राधिकरण, बीड येथे लोकन्यायालयाच्या माध्यमातून करण्यात आली.

दिनांक २८ डिसेंबर २०२२ रोजी तेजस रामदास पाढरे हे बीडहून पैठणकडे जात असताना नवी नागझरी पुढे राक्षसभुवन फाट्याजवळ राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ वर रात्री सुमारे २.२० वाजता भीषण अपघात झाला. या अपघातात तेजस पांढरे यांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता आणि तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्रही दाखल करण्यात आले.मृताच्या वारसांनी ॲड. महेश व्ही. मुंडे यांच्या मार्फत मोटार अपघात प्राधिकरण, बीड (अतिरिक्त सत्र न्यायालय क्र. २) येथे नुकसानभरपाईचा दावा दाखल केला होता. या प्रकरणात विमा कंपनीचे अधिकारी सागर गांगुडे, ऋतुजा सिरसट तसेच कंपनीचे वकील ॲड. रघुराज व्ही. देशमुख यांनी सहभाग घेतला.दिनांक १४ मार्च २०२६ रोजी हे प्रकरण लोकन्यायालयात तडजोडीने निकाली काढण्यात आले. तडजोडीनुसार मृताच्या वारसांना ७० लाख रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली.या प्रकरणात विमा कंपनीतर्फे ॲड. रघुराज व्ही. देशमुख यांनी काम पाहिले, तर वारसांच्या बाजूने ॲड. महेश व्ही. मुंडे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली.

## आधार उद्योजकता प्रशिक्षण केंद्राचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबीर संपन्न

केज दि २१ (प्रतिनिधी) - शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृह येथे आधार उद्योजकता प्रशिक्षण केंद्र यांच्या वतीने दोन दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले.


शेळीपालन, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय प्रशिक्षण संपन्न झाले. या प्रशिक्षणामध्ये शेळ्यांचे आजार, उपचार लसीकरण, चारा व्यवस्थापन शेड व्यवस्थापन, तसेच शासनाच्या वेगवेगळ्या योजना, त्यासाठी लागणारी कागदपत्रे प्रोजेक्ट रिपोर्ट नमुना शासकीय योजनांची किट अनुभव प्रमाणपत्र, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी देण्यात आले. यामध्ये आधार उद्योजकता प्रशिक्षण केंद्राचे मुख्याधिकारी राजेंद्र कांबळे, प्रकल्प अधिकारी निलेश मोटे, डॉ. गणेश गवळी, तज्ञ



प्रशिक्षक जयंत कांबळीकर आदींची उपस्थिती होती. पशु संवर्धन प्रशिक्षणासाठी पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. थळकरी यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणात तालुका भरातून शेतकरी, युवक यांनी प्रशिक्षण पूर्ण केले.

## मृत्यूशी ७४ दिवसांची झुंज संपली अखेर प्रा.ममता राठी यांचे निधन

अंबाजोगाई दि २१ (प्रतिनिधी )- येथील नामांकित महाविद्यालयातील



प्राध्यापिका डॉ. ममता शामसुंदर जखोटिया (राठी) यांची ७४ दिवसांची मृत्यूशी झुंज अखेर संपली . गुढीपाडव्याच्या रात्री ९.४० वाजता लातूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचे निधन झाले.

राठी ह्या ४ जानेवारी रोजी एका दुर्घटनेत त्या ८५ टक्के भाजल्या होत्या. त्यानंतर त्यांच्यावर लातूर येथील रुग्णालयात उपचार सुरू होते. दोन महिन्यापेक्षा अधिक काळ उपचारांना प्रतिसाद देणाऱ्या प्रा. ममता राठी यांची प्रकृती मागील काही दिवसात चिंताजनक झाली होती. अखेर उपचार सुरू असताना गुरुवारी रात्री त्यांचा मृत्यू झाला. वाणिज्य विषयात पीएचडी प्राप्त डॉ. ममता राठी त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे आणि यूट्यूब चॅनेलमुळे विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय होत्या. त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## मुलाने दुचाकीचा हॉर्न का वाजवीला ? म्हणुन बाप,लेकाला रॉडने मारहाण

केज दि २१ (प्रतिनिधी)- तुझ्या मुलाने माझ्या दुकानासमोर दुचाकीचा हॉर्न का वाजवीला ? अशी कुरापत काढून काशीदवाडी येथील पिता, पुत्रांना लाथा, बुक्क्याने मुक्का मार देऊन, व लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केल्या प्रकरणी महादेव जाधवर यांच्या फिर्यादी वरून केज पोलिस ठाण्यात गून्हा दाखल झाला आहे.

सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार केज तालुक्यातील काशीद वाडी येथील एका किराणा दुकाना समोर तुझ्या मुलाने दुचाकीचा हॉर्न का वाजवीला? अशी कुरापत काढून बाप, लेकाला लाथा, बुक्क्याने मुक्का मार देऊन व लोखंडी रॉडने मारहाण करून, आमच्या नादाला लागलास तर तुला जीवे मारून टाकीन अशी जीवे मारण्याची धमकी दिल्या.या प्रकरणी महादेव जयद्रथ जाधवर यांच्या फिर्यादी वरून केज पोलिस ठाण्यात अशोक भगवान जाधवर, सुमित अशोक जाधवर, दादा वशिष्ठ जाधवर तिघेही रा. काशीदवाडी यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार हनुमान मुंडे हे पुढील तपास करीत आहेत.



सर्वत्र रमजान ईद उत्साहात पार पाडलं तसेच काल झालेल्या रमजान ईद निमित्त पारगाव (सीरस ) येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हा अध्यक्ष मा . बळीराम आप्पा गवते यांनी पारगाव येथे जाऊन उपस्थितना सर्व मुस्लिम बांधवांना पारगाव (सीरस ) येथील मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या . त्यासोबत राष्ट्रवादी युवक काँग्रेस उपाध्यक्ष श्रीकांत जयदत्त नवले व समस्त गावकरी यांनी मिळून ईद साजरी केली .

### तृप्ती देसाई यांना राज्य महिला आयोग अध्यक्ष पदावर घ्यावे-रवी देशमुख

उमापूर दि २१ (प्रतिनिधी)- नुकतेच



काही दिवसापूर्वी नाशिक येथील भोंदू बाबा अशोक खरात एका महिलेने बलात्काराचा गुन्हा दाखल केल्यावर संबंध महाराष्ट्रभर महिला आयोगाच्या प्रमुख रूपालीताई चाकणकर यांच्यावर टीका झाली. त्यामुळे त्यांनी उपमुख्यमंत्री सुनिता पवार यांच्याकडे राजिनामा दिला असल्याने राज्य महिला आयोग पद हे रिकामे आहे. तरी भूमाता ब्रिगेड च्या संस्थापक अध्यक्ष तृप्ती ताई देसाई यांना राज्य महिला आयोगावर अध्यक्षपदावर घेऊन संधी देण्यात यावी. तृप्तीताई ह्या नेहमी महिलांसाठी लढा देत आहेत महिलावर होणाऱ्या अन्य अत्याचार वाचा फोडणाऱ्या तृप्ती देसाई यांना राज्य महिला आयोगाचा अध्यक्ष पद द्यावे. अशी मागणी ईमेल द्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे रवी देशमुख यांनी केली आहे

## हरभऱ्याचा ढगावर पडली विज शेतकऱ्याचे झाले मोठे नुकसान

अंबाजोगाई दि २१( प्रतिनिधी)- तालुक्यातील धानोरा खुर्द परिसरात गुरुवार दि १९ जूलै रोजी दुपारी तीनच्या दरम्यान अवकाळी गाराचा पाऊस झाला. रब्बी हंगामातील शेतात कापणी केलेले हरभरा गहू ज्वारी भिजून शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.मात्र सोमनाथ बोरगाव येथे वीज पडून हरभऱ्याचा ढीग जळून शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे.धानोरा खुर्द परिसरातील आपेगाव, तटबोरगाव, अंजनपूर, कोपरा, सोमनाथ बोरगाव, देवळा, माकेगाव, ममदापूर, पाटोदा,अकोला या गावात अवकाळी पाऊस झाला. काही गावात गारा देखील पडल्या या अवकाळी पावसामुळे शेतात कापणी केलेले आणि उभा असलेल्या हरभरा गहू ज्वारी पिकाचे नुकसान झाले आहे. अचानक पाऊस आल्यामुळे ऊसतोड मजुराची तारांबळ उडाली. मांजरा पट्ट्यात अजूनही ऊसतोड सुरू असून या पावसामुळे ऊस भरलेली वाहने शेतात उभी आहेत. अवकाळी पाऊस झाल्यामुळे रब्बी हंगामातील पिकाचे नुकसान झाले आहे.

आंब्याची देखील फळझड होऊन शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.सोमनाथ बोरगाव येथील शेतकरी शिवकन्या हरिश्चंद्र येडे यांच्या दोन एकर मधील शेतातील कापणी करून ढीग लावलेला हरभऱ्याचा ढीग वीज पडून जळून नुकसान झाले आहे.



## ईदनिमित्त, शेर-ऐ-हिंद हजरत टिपू जयंती उत्सव कमिटी कडून नागरिकांना शुभेच्छा

केज दि २१(प्रतिनिधी) - पवित्र रमजान महिन्या नंतर साजरा होणाऱ्या ईद-उल-फित्र या आनंद दायी सणानिमित्त शेर-ऐ-हिंद हजरत टिपू जयंती उत्सव कमिटी, केज यांच्या वतीने सर्व मुस्लिम बांधवांसह सर्व धर्मीय नागरिकांना हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या . कमिटीचे प्रमुख सदस्य ईरफान पठाण, अमन पठाण, नासेर तांबोळी, साहिल तांबोळी, इम्रान सय्यद, वाहेद तांबोळी यांनी एकत्र येत ''ईद हा केवळ एक धार्मिक सण नसून, तो प्रेम, बंधुभाव आणि एकतेचा संदेश देणारा सण असल्याचे नमूद केले

# संपादकीय

## गाझा, व्हेनेझुएला, इराणनंतर ट्रम्पच्या रडारवर कोण ?

मनमानी आणि बेमूर्वत कारभारासाठी ख्यात डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकन अध्यक्षपदाला काळीमा फासला आहे. एकीकडे शांततेचा नोबेल पुरस्कार मिळावा असा हट्ट धरायचा आणि दुसरीकडे कोट्यवधी निष्पाप जीवांशी खेळायचे, अशी त्यांची अहमहमिका आहे. गाझा पट्टीमध्ये शेकडो कुटुंबांना उद्ध्वस्त केल्यानंतर तेथे भव्य पर्यटन सिटी साकारण्याचा मनसुबा व्यावसायिक ट्रम्प यांनी जाहीर केला. सारे जगच त्याने अचंबित झाले. हे सारे थांबत नाही तोच ट्रम्प यांच्या आदेशाने व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांची पत्नी सेलिया फ्लोरेस यांचे पहाटेच्या सुमारास अपहरण झाले. अमेरिकन फौजांनी अध्यक्ष निवासात घुसून ही कारवाई केली. त्यानंतर गेल्या महिन्यात इराणचे सर्वेसर्वा अली खामेनी यांच्यासह सत्ताधारी गटातील अनेक उच्चपदस्थ अधिकारी आणि इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सच्या नेत्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. आंतरराष्ट्रीय कायदे, नियम आणि संकेतांना केराची टोपली दाखवत ट्रम्प यांची ही हुकूमशाही जगासाठी चिंताजनकच आहे. आता त्यांनी क्युबा या देशाकडे मोर्चा वळविला आहे. जगाचे लक्ष सध्या इराण आणि इस्रायलमधील युद्धाकडे लागलेले असतानाच कॅरेबियन देश क्युबा एका भीषण अंधकारमय संकटात सापडला आहे. पश्चिम आशिया धगधगत असताना क्युबाची राजधानी हवानासह संपूर्ण देश सलग दुसऱ्यांदा 'ब्लॅकआऊट'चा सामना करत आहे. क्युबाची मुख्य वीज ग्रीड अचानक कोलमडल्यामुळे सुमारे १.१ कोटी जनता अंधारात बुडाली आहे. हे संकट केवळ वीज जाण्यापुरते मर्यादित नाही; याचे परिणाम अत्यंत गंभीर आहेत. रुग्णालये विजेविना ठप्प झाली आहेत. आपत्कालीन शस्त्रक्रिया आणि व्हेंटिलेटरवर असलेल्या रुग्णांच्या जीवाचा धोका वाढला आहे. रस्त्यावरील सिग्नल यंत्रणा आणि इंधन पंप बंद पडल्याने वाहतूक व्यवस्था ठप्प झाली आहे. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि अन्नाचे साठवणूक (रेफ्रिजरेशन) यावरही मोठा परिणाम झाला आहे.क्युबातील या परिस्थितीला नैसर्गिक कारणांपेक्षा राजकीय कारणे अधिक जबाबदार मानली जात आहेत. अमेरिकेने क्युबावर लादलेले कठोर आर्थिक निर्बंध हे या संकटाचे मूळ कारण आहे. अमेरिकेच्या धोरणांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारातून तेल खरेदी करणे क्युबासाठी अशक्य झाले आहे. इंधन नसल्यामुळे वीज प्रकल्पांची इंजिने शांत पडली आहेत. निर्बंधांमुळे क्युबाला जुन्या झालेल्या पॉवर प्लांट्ससाठी सुटे भाग मिळत नाहीत, ज्यामुळे यंत्रणा वारंवार कोलमडत आहे. अमेरिकेत यंदा निवडणूक रणधुमाळी असणार आहे. हे जाणून डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा आपल्या आक्रमक परराष्ट्र धोरणाचे संकेत दिले आहेत. गाझा, व्हेनेझुएला आणि इराणनंतर आता ट्रम्प यांच्या रडारवर क्युबा असल्याचे चित्र दिसत आहे. ट्रम्प यांनी आपल्या मागील कार्यकाळात देखील क्युबावर सर्वाधिक निर्बंध लादले होते. आता पुन्हा सत्तेत आल्याने त्यांनी हे निर्बंध अधिक कडक केले आहेत. ट्रम्प यांचा 'क्युबा'ला विरोध हा केवळ आर्थिक नसून राजकीय आहे. क्युबाची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडवून तिथे राजकीय परिवर्तन घडवून आणणे, हा यामागील सुप्त हेतू आहे. आपल्या मर्जीचे सत्ताधारी तेथे असावेत आणि क्युबातील नैसर्गिक साधन संपत्तीवर ताबा मिळावा यासाठी ट्रम्प यांचा अट्टाहास आहे. क्युबातील जनता आधीच महागाई आणि अन्नधान्याच्या टंचाईशी झुंजत असताना, या वीज संकटामुळे त्यांच्या संयमाचा अंत पाहायला मिळत आहे. क्युबाचा सर्वात मोठा मित्र देश व्हेनेझुएला सध्या स्वतःच्या अंतर्गत समस्यांनी आणि अमेरिकन दबावामुळे क्युबाला इंधन पुरवठा करू शकत नाही. इंधनाअभावी वीज प्रकल्प चालवणे क्युबासाठी जिकिरीचे झाले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या आक्रमक विधानांनी पुन्हा एकदा जागतिक राजकारणात खळबळ माजवून दिली आहे. गाझामध्ये भीषण युद्धानंतर तिथे 'पर्यटन शहर' उभारण्याचे त्यांचे विधान हे केवळ व्यावसायिक नसून ते 'साम्राज्यवादी' मानसिकतेचे निदर्शक मानले जात आहे. व्हेनेझुएलाच्या अंतर्गत व्यवस्थेत केलेली ढवळाढवळ आणि इराणमधील खामेनी यांच्या पश्चात निर्माण झालेली पोकळी, या सर्वांनंतर ट्रम्प यांचे लक्ष आता क्युबाकडे वळले आहे. क्युबा हा एक अयशस्वी देश आहे, त्यांच्याकडे पैसे नाहीत, तेल नाही. त्यांच्याकडे फक्त सुंदर जमीन आहे, असे विधान करत ट्रम्प यांनी क्युबावर ताबा मिळवण्याचे किंवा तिथे सत्तापरिवर्तन करण्याचे संकेत दिले आहेत. इतिहासाची पाने चाळता क्युबा आणि अमेरिकेचे संबंध अनेक चढ-उतारांनी भरलेले आहेत. विशेषतः क्युबन मिसाईल क्राईसिसनंतर दोन्ही देशांमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. काही दशकांनी संबंध सुधारण्याचा प्रयत्न झाला. बराक ओबामा यांनी ५० वर्षांपासूनचा शत्रूभाव संपवून 'मैत्रीपूर्ण' संबंध प्रस्थापित करण्यावर भर दिला होता. ओबामांनी क्युबाचे नाव 'दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या देशांच्या' यादीतून काढून टाकले. ८८ वर्षांनंतर क्युबाला भेट देणारे ओबामा हे पहिले अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ठरले. ओबामांचे धोरण 'निर्बंधांऐवजी संवादातून बदल' घडवण्याचे होते, ज्यामुळे दोन्ही देशांतील तणाव मोठ्या प्रमाणात कमी झाला होता. आता ट्रम्प यांच्या अध्यक्षीय कार्यकाळात क्युबाशी पुन्हा संबंध बिघडले आहेत. इतिहास साक्ष आहे की, अमेरिकेने जेव्हा जेव्हा एखाद्या देशावर 'आर्थिक निर्बंध' लादले, तेव्हा तिथे सत्तापालटाचा मार्ग मोकळा झाला आहे. क्युबाच्या बाबतीतही हेच घडताना दिसत आहे. वीज कपातीमुळे लोकांमध्ये असलेला असंतोष वाढवून, तिथल्या कम्युनिस्ट राजवटीला शह देणे हा अमेरिकेचा मुख्य उद्देश आहे. या सर्व घडामोडींचा परिणाम केवळ त्या देशांपुरता मर्यादित नाही. इराणमधील युद्धामुळे कच्च्या तेलाचे दर गगनाला भिडले आहेत, ज्याचा थेट फटका भारतीय अर्थव्यवस्थेलाही बसत आहे. क्युबातील अस्थिरता ही रशिया आणि चीनच्या वर्चस्वाला अमेरिकेने दिलेले थेट आव्हान आहे. गाझा पट्टीत सुमारे २१ लाख नागरिक राहतात. ऑक्टोबर २०२३ पासून सुरू झालेल्या युद्धात जवळपास ५० हजार जणांची निर्घृण हत्या झाली आहे. यात महिला आणि मुलांची संख्या मोठी आहे. सुमारे लाखभर जखमी झाले आहेत, तर १९ लाख जण बेघर झाले आहेत. व्हेनेझुएलाची एकूण लोकसंख्या सुमारे २.९ कोटी आहे. तेथे थेट युद्ध सुरू नसले तरी राजकीय अस्थिरता आणि आर्थिक संकटामुळे गेल्या काही वर्षांत लाखो लोकांनी देश सोडला आहे. इराणची एकूण लोकसंख्या सुमारे ८.९ कोटी आहे. इराण आणि इस्रायल यांच्यातील थेट संघर्षात आतापर्यंत झालेल्या जीवितहानीचा निश्चित आकडा समोर आलेला नाही. मात्र, गेल्या १८ दिवसांत शेकडो जण ठार झाले आहेत. अनेक पायाभूत सुविधा नष्ट झाल्या आहेत. शेकडो लोक जखमी झाल्याचा अंदाज आहे. क्युबाची एकूण लोकसंख्या सुमारे १.१ कोटी आहे. सध्या तेथे युद्ध सुरू नसले तरी वीज, अन्न आणि औषधांचे मोठे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. म्हणजेच, कोट्यवधी जनतेच्या जीवाशी खेळ करण्याचे काम ट्रम्प यांच्याकडून सुरू आहे. एकीकडे इराण-इस्रायल युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्था अस्थिर आहे, तर दुसरीकडे क्युबासारखा छोटा देश महासत्तांच्या राजकारणात भरडला जात आहे. जर क्युबातील हे वीज संकट लवकर सुटले नाही, तर तिथे मोठे मानवी संकट उभे राहण्याची शक्यता आहे. गाझातील ढिगाऱ्यांवर रिसॉर्ट्स उभारण्याचे स्वप्न पाहणारी महासत्ता आणि व्हेनेझुएला व इराणमध्ये नेतृत्व संपवून लोकशाही आणण्याचा दावा करणारी यंत्रणा, आता क्युबाला 'अंधारातून प्रकाशाकडे' नेण्याच्या नावाखाली कोणत्या थराला जाईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. क्युबाचा हा 'ब्लॅकआऊट' केवळ विजेचा नसून, तो एका छोट्या राष्ट्राच्या सार्वभौमत्वावर आलेल्या संकटाचा इशारा आहे. दरम्यान, अमेरिकेच्या पावलावर पाऊल ठेवून चीनने तैवानचा घास घेण्याचा प्रयत्न केला तर ते नवल राहणार नाही, असे तज्ज्ञांचे मत आहे.

# कर्जणी गावात घर पाडण्याच्या इशाऱ्यावर ग्रामस्थ आक्रमक

बीड दि २१ (प्रतिनिधी)-शासनाने तलाव बांधकामासाठी जागा घेतल्यानंतर गावकऱ्यांचे स्थलांतर करण्यात आले होते. त्यावेळी ग्रामस्थांना गायरान जमिनीवर घरे बांधण्यास सांगण्यात आले होते. त्यानुसार सर्व गावकऱ्यांनी आपली जुनी घरे सोडून डोंगराचा भाग समतल करून स्वतःच्या मेहनतीने घरे उभारली. या प्रक्रियेला सुमारे ५० ते ५५ वर्षांचा कालावधी लोटला आहे.

मात्र, सध्या वन विभागाचे अधिकारी या ठिकाणी येऊन ग्रामस्थांना घरे पाडण्याच्या सूचना देत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. ही जमीन वन विभागाची असून येथे केलेले बांधकाम काढून टाका, अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशारा अधिकाऱ्यांकडून दिला जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.या पार्श्वभूमीवर शिवसेना व गुजर समाज आक्रमक झाला असून, घरांवर कारवाई केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. जर आमची घरे पाडण्याची वेळ आली, तर आम्ही तलावाचा सांडवा फोडल्याशिवाय राहणार नाही, असा गंभीर इशारा शिवसेना जिल्हा संघटक तथा गुजर समाज जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी पत्रकाद्वारे दिला आहे.यावेळी गुजर समाज जिल्हा उपाध्यक्ष अशोक घुशीर, जिल्हा संघटक अरुण नाना खटाने, जिल्हा उपाध्यक्ष सुनील बहिरवाळ, जिल्हा कोषाध्यक्ष गजानन बहिरवाळ, जिल्हा सचिव राजाभाऊ गुजर, तालुका अध्यक्ष शहादेव डोंगर तसेच समाज बांधव व शिवसैनिक उपस्थित होते. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून ग्रामस्थांशी चर्चा करून प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा मोठ्या आंदोलनाला सामोरे जावे लागेल, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.



# डॉ.ज्योतीताई मेटे यांची महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करावी-डॉ.गणेश ढवळे



बीड दि.२१(प्रतिनिधी):- नुकत्याच रिक्त झालेल्या महिला आयोगाच्या अध्यक्षपदी संवेदनशील, उच्चशिक्षित, सुसंस्कृत आणि प्रदीर्घ प्रशासकीय अनुभव असलेल्या डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री व बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना लेखी निवेदन सादर केले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महिला आयोगाचे अध्यक्षपद हे अत्यंत जबाबदारीचे असून महिलांचे घटनात्मक हक्क, सुरक्षितता आणि कायदेशीर संरक्षण सुनिश्चित करण्याचे महत्त्वाचे कार्य या पदावरून केले जाते. महिलांवरील अत्याचार, घरगुती हिंसाचार, कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ यांसारख्या प्रकरणांची दखल घेऊन सखोल चौकशी करणे आणि योग्य ती कारवाई करणे ही आयोगाची प्रमुख जबाबदारी आहे.तसेच, महिलांच्या सुरक्षेशी संबंधित कायद्यांचे पुनरावलोकन करून त्यामध्ये आवश्यक सुधारणा सुचवणे, महिला सक्षमीकरणासाठी जनजागृती करणे, स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी मोहिमा राबवणे, तसेच कारागृह व सुधारगृहांमध्ये महिलांच्या स्थितीची पाहणी करून आवश्यक उपाययोजना करणे, ही देखील आयोगाची महत्त्वाची कार्ये आहेत.सध्याच्या काळात वाढत असलेल्या सायबर गुन्हे आणि कार्यस्थळी होणाऱ्या छळाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर सक्षम आणि अनुभवी नेतृत्वाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे डॉ. ज्योतीताई मेटे यांसारख्या पात्र उमेदवाराची नियुक्ती करून महिला आयोगाची प्रतिमा अधिक सक्षम व विश्वासार्ह करण्याची संधी शासनाने साधावी, अशी मागणी डॉ. ढवळे यांनी केली आहे.

# महिलावरील अत्याचाराला आळा बसवण्यासाठी अशोक खरातासारख्या भोंदूवर कडक कारवाई करा-शिवसंग्राम

## महिला अत्याचारावरील घटनेची सुनावणी फास्टट्रॅक न्यायालय मार्फत करण्यात यावी-ॲड.मनीषाताई कुपकर



बीड दि २१(प्रतिनिधी)- महिला अत्याचारावरील घटना वारंवार वाढत आहेत . अशा प्रवृत्तीवर कायमस्वरूपी आळा बसवण्यासाठी अशोक खरात सारख्या भोंदू बाबाला कडक शासन झाले पाहिजे. अशी मागणी शिवसंग्रामच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली .याप्रसंगी उपस्थित शिवसंग्रामच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा ड.मनिषाताई कुपकर, ॲड.रूपाली गायकवाड , ॲड.ज्योती सोळुंके, ॲड.सोनाली कराड , ॲड. एस ए दाणी आदी उपस्थित होत्या.

या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले की, राज्यात उघडकीस आलेल्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी शासनाने विशेष तपास पथक (डखढ) स्थापन केल्याबद्दल आम्ही शासनाचे आभार व्यक्त करीत आहोत. सदर प्रकरण अत्यंत गंभीर असून, यामध्ये महिलांवरील अत्याचार व शोषणा संबंधी गंभीर बाबी समोर आलेल्या आहेत. विविध माध्यमांद्वारे अनेक महिलांचे शोषण झाल्याच्या चर्चा असून, काही व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित होत असल्याचे निदर्शनास येत आहे. या सर्व बाबींची सखोल चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे.तसेच, उपलब्ध माहितीनुसार अहिल्यानगर येथील पत्रकार श्री. दत्तात्रय खेमनर यांनी यापूर्वीच सदर प्रकरणातील गंभीर बाबी जनतेसमोर आणण्याचा प्रयत्न केला होता. तथापि, त्या वेळी संबंधित प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्याच्या बाबीही चर्चेत आल्या होत्या. त्यामुळे अशा प्रकारची कोणतीही घटना पुन्हा घडू नयेत . अशा प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने कठोर कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे. शिवसंग्रामच्या वतीने काही मागण्या मांडण्यात आल्या जसे की १.एसआयटीमार्फत पुढील तपास पूर्णपणे निष्पक्ष, पारदर्शक व कायद्याच्या चौकटीत राहून करण्यात यावा.२. तपास प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा राजकीय किंवा इतर बाह्य हस्तक्षेप होऊ नये, याची काटेकोर दक्षता घ्यावी.३.यापूर्वी प्रकरण समोर आणणाऱ्या पत्रकारांच्या बाबतीत कोणताही अन्याय किंवा दबाव झाला असल्यास त्याचीही चौकशी करण्यात यावी.४. प्रकरणातील सर्व पुरावे, विशेषतः कथित व्हिडिओ व डिजिटल सामग्री यांची वैज्ञानिक पद्धतीने तपासणी करण्यात यावी.५.पीडित महिलांची ओळख गोपनीय ठेवून त्यांना आवश्यक ते संरक्षण व न्याय मिळवून द्यायला पाहिजे. ६.दोषींवर कठोर व तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात यावी. ७. सदर प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता या घटनेची सुनावणी जलद गती फास्टट्रॅक न्यायालय मार्फत करण्यात यावी जेणेकरून पीडित महिलांना त्वरित न्याय मिळू शकेल.८. राज्यात अशा प्रकारच्या भोंदूबाबांच्या वाढत्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात यावी.सदर प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता, आपण योग्य ती कार्यवाही करून पीडितांना न्याय मिळवून द्याल, ही अपेक्षा यासोबतच, राज्यात अशा प्रकारच्या भोंदूबाबांच्या घटनेमुळे महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची तक्रार शिवसंग्रामच्या महिला आघाडीच्या वतीने करण्यात आली.

# रामनवमीच्या निमित्ताने श्रीराम पहाट कार्यक्रमाचे आयोजन

नांदेड, दि.२१ (प्रतिनिधी)-श्रीराम नवमीचे औचित्य साधत २६ मार्च रोजी नांदेड येथे श्रीराम पहाट या सुरमयी संगीत सोहळ्याचे भव्य आयोजन २६ आले आहे. यावेळी महाराष्ट्रातील प्रतिभावंत गायकांच्या सुरेल सुरावटीतून सादर होणारी सुमधुर रामगीते रसिक श्रोत्यांसाठी श्रवणीय पर्वणी ठरणार आहेत. येथील डॉ.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात २६ रोजी गुरुवारी पहाटे साडे पाच वाजता आयोजित श्रीराम पहाट या भक्तिमय संगीतपर्वाचा शुभारंभ जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या हस्ते होणार असून मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, प्रसिद्ध पोटविकार तज्ञ डॉ.नितीन जोशी, डॉ.सुशील राठी, वेदशास्त्र संपन्न मनोजगुरू पेठवडजकर, उद्योजक रमेश पारसेवार, भगिरथ राठी यांची याप्रसंगी विशेष उपस्थिती असणार आहे.श्रीराम नवमीच्या पावन पर्वावर सादर होणाऱ्या या संगीत सोहळ्यात प्रशांत काळुन्द्रेकर (मुंबई), प्रज्ञा देशपांडे (पुणे), संज्योती जगदाळे (मुंबई) आदी सुप्रसिद्ध गायक आपल्या सुमधुर स्वरात रामगीते सादर करणार आहेत. त्यांना मंदार गोडसे, विवेक परांजपे, यश सोमण, पंढरीनाथ दरेकर, पंकज शिरभाते, भगवान देशमुख विविध वाद्यावर साथसंगत करणार आहेत.

एकापेक्षा एक सरस रामगीतांची अविट गोडी जपतांना त्याच्या जोडीला ॲड.गजानन पिंपरखेडे यांचे दर्जेदार निरूपणही यावेळी होणार असून या उपक्रमाची निर्मिती व संकल्पना देखील त्यांचीच आहे. या अप्रतिम निर्मितीला ज्येष्ठ पत्रकार विजय जोशी यांचे उल्लेखनीय सहाय्य लाभले आहे.रामसेवा गौरव पुरस्कार प्रभू श्रीराम यांचा १७ कोटी नामजप पूर्ण करणारे ॲड.व्यंकटेश पाटणूरकर व पवित्र अमरनाथ धाम येथील आतापर्यंत २७ यात्रा सफल करणारे ॲड.दिलीप ठाकूर यांना श्रीराम पहाट सोहळ्याच्या भव्य मंचावर रामसेवा गौरव पुरस्कार देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

# बलभीम महाविद्यालयाची ए.पी.जे.अब्दुल कलाम अंतराळ विज्ञान केंद्राला अभ्यास भेट

बीड दि २१ (प्रतिनिधी)- येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील गणित व भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने दि. १८ मार्च २०२६ रोजी महात्मा गांधी मिशन च्या ए.पी.जे.अब्दुल कलाम अंतराळ विज्ञान केंद्र, छत्रपती संभाजीनगर येथे अभ्यास सहल आयोजित करण्यात आली होती. प्राचार्य डॉ.संतोष उंदरे यांच्या मार्गदर्शनात नवीन शैक्षणिक धोरणाच्या अभ्यासक्रमानुसार बी.एस्सी. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी या अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या अभ्यास सहलीत अंतराळातील ग्रह तारे, भारतीय अवकाश संशोधन संस्था राबवत असलेल्या विविध अंतराळ मोहीमा, गणित प्रयोगशाळा, विद्युत चुंबकीय उपकरणांचे विविध प्रयोग, विश्वाची निर्मिती, कृष्णविवर यांची विस्तृत अशी माहिती प्रसिद्ध शास्त्रज्ञ श्रीनिवास औंधकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी सांगितली. तसेच विद्यार्थांनी इतर ग्रहावरील गुरुत्वाकर्षणाचा आपल्या वजनावर होणारा परिणाम प्रत्यक्ष उपकरणाच्या सहाय्याने मोजला. या अभ्यास सहलीमुळे



विद्यार्थ्यांना आपला अभ्यास भेट प्रकल्प सादर करण्यास मदत होणार आहे.या अभ्यास सहलीत आयक्यूएसी समन्वयक व गणित विभागप्रमुख डॉ.अनिल चिंधे, भौतिकशास्त्र विभागप्रमुख, डॉ. बी. टी. ताटे, डॉ. के.आर देसाई, डॉ. राम भोसले, डॉ. के.ए. पानगावकर यांच्यासह भौतिकशास्त्र व गणित विभागाच्या एकूण ३९ विद्यार्थांनी सहभाग घेतला होता.

# अंबाजोगाईत रमजान ईद उत्साहात साजरी ; नेत्यांनी दिल्या मुस्लिम बांधवाना शुभेच्छा



अंबाजोगाई दि २१ (प्रतिनिधी) - शहरांसह तालुक्यात रमजान ईद मोठ्या उत्साहात शनिवारी साजरी करण्यात आली. रमजानमध्ये महिनाभर मुस्लिम बांधव उपवास धरतात. शेवटच्या दहा उपवासादरम्यान सर्वत्र इफ्तार पार्टीचे आयोजन केले जाते. या दरम्यान कपडे, सोने, सुकामेवा खरेदीसाठी बाजारात ग्राहकांची झुंबड उडते. यंदा रमजान महिन्याच्या निमित्ताने शहरातील बाजारात महिन्याभरात लाखो रुपयांची उलाढाल झाल्याचे सांगण्यात आले. अंबाजोगाईत ईदच्या अनुषंगाने शनिवारी सकाळी १० वाजता शहरांतील दोन्ही ईदगाह मैदानावर सामुदायिक नमाज अदा करण्यात आली. त्यानंतर मशीदच्या इमामकडून सामुदायिक प्रार्थना करण्यात आली. प्रार्थनेनंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. शहरातील दोन्ही ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी आमदार नमिता मुंदडा, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, माजी आमदार पृथ्वीराज साठे, माजी आमदार संजय दौंड, नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, युवानेते अक्षय मुंदडा, उपनगराध्यक्ष दिनेश भराडिया, अपर पोलिस अधीक्षक चेतना तिडके, डॉ. राजेश इंगोले, डॉ. नरेंद्र काळे यांच्यासह राजकीय, सामाजिक, प्रशासकीय, पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी मोठी गर्दी केली होती.

# अंभोरा येथे अंबेश्वर यात्रा उत्सव यात्रेनिमित्त कुस्त्यांचा जंगी हंगामा

अंभोरा दि २१ (प्रतिनिधी)- आष्टी तालुक्यातील अंभोरा येथे २३व २४ मार्च रोजी अंबेश्वराची भव्य यात्रा मोठ्या उत्साहात भरत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही २३मार्च रोजी अंबेश्वराची यात्रा पार पडणार असून २४ मार्च रोजी कुस्त्यांचा जंगी हंगामा रंगणार आहे. अंभोरा येथील अंबेश्वर (शंभू महादेव) मंदिर हे पुरातन हेमाडपंथी शैलीतील असून नवसाला पावणारा आंबेश्वर म्हणून संपूर्ण परिसरात प्रसिद्ध आहे. त्यामुळे दूरदूरवरून भाविक येथे नवस फेडण्यासाठी येतात. वर्षभर केलेले नवस या दिवशी श्रद्धेने पूर्ण केले जातात.

यात्रेच्या पहिल्या दिवशी सकाळी कावडीने पाणी आणण्याची परंपरा विशेष आकर्षण ठरते. भर उन्हात गावातील तरुण, भाविक तसेच वृद्ध मंडळी पायी चालत पैठण व वृद्धेश्वर या ठिकाणाहून कावडीतून पवित्र पाणी आणतात. या कावडींची वाजत-गाजत गावातून मिरवणूक काढली जाते आणि ते पाणी अंबेश्वर महादेवाच्या पिंडीवर अभिषेकासाठी अर्पण केले जाते.त्यानंतर दुपारनंतर नवस फेडण्याचा कार्यक्रम सुरू होतो. सायंकाळी चार वाजल्यापासून गूळ, नारळ आणि पेढ्यांची शेरणी वाटली जाते. प्रत्येक कुटुंब वाजत-गाजत देवाला पेढ्यांचा नैवेद्य अर्पण करते. संध्याकाळी निघणारी छबीना मिरवणूक ही यात्रेचे मुख्य आकर्षण असून ती पहाटेपर्यंत सुरू राहते. पहाटे तसेच रात्री बारानंतर मोठ्या प्रमाणावर आतिषबाजी करण्यात येते. यात्रेचा दुसरा दिवसही तितकाच आकर्षक असतो. सकाळी विविध लोककला सादर करणाऱ्या कलावंतांचा हजेरी कार्यक्रम आयोजित केला जातो. परिसरातील कलाकार आपल्या कलेचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकतात. यावेळी तमाशा कलावंतांचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.यानंतर दिवसाचे प्रमुख आकर्षण म्हणजे जंगी कुस्त्यांचा हंगाम. विविध भागांतील नामांकित मल्ल या फडासाठी हजेरी लावतात. दुपारी तीन वाजल्यापासून कुस्त्यांना सुरुवात होते आणि संध्याकाळपर्यंत रंगतदार सामने पाहायला मिळतात. त्यानंतर संध्याकाळी विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांनी यात्रेची सांगता होते.या यात्रेनिमित्त मोठ्या प्रमाणावर खेळण्याची दुकान व इतर दुकाने येत असतात लहान मुलांपासून तर वृद्धांपर्यंत या यात्रेचा आकर्षण असते.अशाप्रकारे दोन दिवस धार्मिक, सांस्कृतिक आणि क्रीडात्मक कार्यक्रमांची रेलचेल असलेल्या या यात्रेचा लाभ परिसरातील भाविकांनी घ्यावा, असे आवाहन यात्रा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रा.टी.पी.मुंडे यांनी मुस्लिम बांधवांची गळाभेट घेत दिल्या रमजान ईद सणाच्या शुभेच्छा

परळी वै. दि २१ (प्रतिनिधी)- हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेला रमजान ईद हा मुस्लिम बांधवांचा पवित्र सण संबंध देशभरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला गेला.या सणाचे औचित्य साधून शिवसेनेचे नेते तथा बीड जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.टी.पी.मुंडे (सर) यांच्या प्रमुख उपस्थिती त्यांनी मुस्लिम बांधवांना गळाभेट घेत ईदच्या शुभेच्छा दिल्या.

नेहरू चौक व मलकापूर येथील ईदगाह या ठिकाणी सकाळी शुभेच्छा देण्यासाठी पेंडल लावण्यात आला मुस्लिम बांधवांची नमाज पठण व धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर त्यांनी गळाभेट घेत शुभेच्छा दिल्या. मुस्लिम बांधव आणि प्रा.टी.पी.मुंडे सर हे एक समीकरण गेल्या ३० वर्षापासून तयार झाले आहे. दरवर्षी मुस्लिम बांधवांना पवित्र रमजानच्या शुभेच्छा ते देत असतात या महिन्यात अतिशय कडक उन्हाळ्यात मुस्लिम बांधव अल्लाची उपासना करत महिनाभर रोजा (उपवास) करतात. मुस्लिम बांधवांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेउन शुभेच्छा दिल्या आणि शीरखुर्मा चा आस्वाद बांधवांसोबत घेतला. हा स्नेहभाव गेल्या तीस वर्षापासून त्यांनी जपला आहे. यावेळी महेश बँकेचे अध्यक्ष ओमप्रकाश सारडा, शिवसेनेचे नेते राजा भैय्या पांडे, सूर्यकांत मुंडे, प्रा.विजय मुंडे,शाम गडेकर, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप भैय्या (बबलू शेठ)मुंडे, बाबासाहेब शिंदे, नवनाथ क्षीरसागर, विश्वनाथ गायकवाड, रघुनाथ डोळस, राहुल कांदे,शिवा बडे, हनुमंत गुट्टे, भोपल्याचे सरपंच बाळासाहेब मुंडे, श्रीमंत कांगणे, ब्रह्मदेव मुंडे,माणिक बनसोडे,महादेव दौंड,केशव फड, वृक्षराज आंधळे, पिंटू देवडे, अरुणाचल रोडे, पांडुरंग निकते, प्रवीण घाडगे,



अण्णा सरवदे आदीसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बहुजन समाज पार्टीची मंगळवारी बैठक

नांदेड (प्रतिनिधी) : बहुजन समाज पार्टी जिल्हा शाखा नांदेडची तातडीची बैठक मंगळवार दि. २४ मार्च २०२६ रोजी दुपारी १ वाजता जिल्हा कार्यालय नांदेड येथे आयोजित करण्यात आली आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त व बहुजन समाज पार्टीच्या वर्धापन दिनानिमित्त मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. तो कार्यक्रम पार पाडण्याच्या अनुषंगाने ही बैठक महत्वाची ठरणार आहे.बहुजन समाज पार्टी जिल्हा कार्यालय, बी.एस.पी. भवन, कावळे कॉम्प्लेक्स, वाय पॉइंट नांदेड येथे आयोजित या महत्वाच्या बैठकीला नांदेड जिल्ह्यातील सर्व नऊ विधानसभेच्या पदाधिकाऱ्यांनी वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष सुभाष भोकरे यांनी केले आहे.या बैठकीस बसपाचे महाराष्ट्र प्रभारी संतोषजी शिंदे, महाराष्ट्र प्रदेश सदस्य इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर, मराठवाडा झोन प्रभारी मनीषभाऊ कावळे हे मार्गदर्शन करणार आहेत, असे बहुजन समाज पार्टी नांदेड जिल्हा अध्यक्ष यांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# २२ मार्च विश्व जल दिवस

आज जगात पाणी हा महत्वाचा घटक आहे.कारण जल नहीं तो कुछ नहीं! पृथ्वीतलावर मानवजातीच्या अतीरेकामुळे आज निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे.अन्न, वस्त्र, निवारा याची मुख्य जळ-मुळ पाणी आहे.कारण पाण्याशिवाय कोणतीही गोष्ट शक्यच नाही.भारतासह अनेक देशांमध्ये दरवर्षी पाण्याचा हा!हा!कार! होतांना आपण पाहतो.भारतात मार्च महिन्यापासुनच देशातील अनेक भागांत पाण्याची समस्या निर्माण होत असते.आजही अनेक देश पाण्यासाठी कडवी झुंज देत आहे. आज आपण कुठेही गेलो तरी पाणी अती आवश्यक आहे.आकाश-पाताळ,पुर्व-पश्चिम, उत्तर- दक्षिन म्हणजेच आपण जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी मानव, पशु-पक्षी व संपूर्ण जीवजंतू हे पाण्याविना जगुच शकत नाही.पाण्याविना निसर्ग नाही व मानवही नाही.म्हणजेच आज पाणी सर्वांसाठीच अनमोल आहे.त्यामुळे पाण्याचे महत्व सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे.१९९२ ला पर्यावरण व विकास या विषयावर संयुक्त राष्ट्र संमेलन आयोजित करण्यात आले होते.यावेळेस विश्व जल दिवस या विषयावर चर्चा करण्यात आली व संयुक्त राष्ट्र संघानेने प्रत्येक वर्षी २२ मार्चला विश्व जल दिवस साजरा करण्याचे जाहीर केले.यानंत १९९३ मध्ये २२ मार्चला संपूर्ण जगात विश्व जल दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला.यावेळेस जल संरक्षण आणि रख-रखाव यावर जनजागृतीचे मोठे अभियान छेडण्यात आले.विश्व जल दिवसाला पाणी वाचविण्याचा ''संकल्प'' दिवस



सुध्दा म्हटल्या जाते.या दिवसाला पाणी संरक्षणा विषयी जागृकता व पाण्याचे महत्व याला जास्त महत्त्व दिले जाते.आज मानवाच्या जीवनाचा महत्वाचा घटक म्हणजे पाणी आहे.कारण पाण्याविना संपूर्ण सृष्टीअधुरी आहे.आपण जगाच्या भुभागाचा विचार केला तर या पृथ्वीतलावर ७० टक्के पाणी व ३० टक्के भुभाग आहे.तरीही जगात पीण्याच्या पाण्याची समस्या अत्यंत गंभीर असल्याचे दिसून येते.कारण ७० टक्के समुद्राचे पाणी खारे असल्यामुळे पीण्यायोग्य नाही.सध्या संपूर्ण जग अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करतांना दिसते.त्यामुळे जगात अनेक नवीन नवीन समस्या उदयास येतांना दिसतात.त्यामुळे आज संपूर्ण जगात पीण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते.कारखाण्यांच्या दुषीत वातावरणामुळे व तापमानामुळे अनेक हिमकडे कोसळताना आपण पहातो. यामुळे संपूर्ण जगात महाप्रलय, सुनामी आल्याचेसुध्दा आपणासर्वांना ग्यात आहे.जगातील हिमकडे साबुत रहाले तर पाण्याची समस्या आपोआप कमी होईल.परंतु मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी हिमकड्यांचा बळी घेतांना दिसत आहे. अनेकदा देवभुमित आलेला महाप्रलय हा हिमकडा कोसळल्याने आलेला महाप्रलय आहे.संपुर्ण भारतात ८० टक्के पीण्यायोग्य पाणी हिमकड्यातुन मीळत असते.अनेक मोठमोठी जंगले अजुनही जळत आहे.कारण मानवाने जमीनीच्या पोटातील पाणी संपूर्णतः निचोडुन (आटवुन) टाकले आहे.जगातील अनेक भागात ज्वालामुखीचा उद्रेक मोठ्या प्रमाणात होतांना आपण पहातो.भुकंप,सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण घटना पृथ्वीतलावर पाण्याची पातळी कमी होत असल्याने होत आहे. कारण जंगलसंपदा टीकुन रहाली असती तर पाण्याची समस्या मुळातच रहालीच नसती.पाणी टीकुन रहाले असते तर ज्वालामुखी, सुनामी, महाप्रलय,भुकंप,वनवे लागने इत्यादी विनाशकारी घटनांचा उद्रेक झाला नसता. अजुनही मानवजाती पाण्याचे महत्व समजल्याचे दिसून येत नाही.पुर्वी नदी,ओढे, तलाव,झिरा व विहिरीतून पाणी घ्यायचे परंतु आता नदी,तलाव व विहिरी आटुलागल्या आहेत. विहीरीची खोली ५० ते ६० फुटांपर्यंत असायची परंतु पाण्याचा दुष्काळ पहाता ५० ते ६० फुटांपर्यंतचे विहिरीचेसुध्दा पाणी आटल्याचे दिसून येते.त्यामुळे आता मानवजातीने बोरवेलचा सहारा घेऊन ५०० ते ७०० फुटांवर पाण्यासाठी जावे लागत आहे.मनुष्याला पाण्याचा अधिकार फक्त ५० ते ६० फुटांपर्यंतच होता.परंतु मानवाने पाण्यासाठी संपूर्ण सीमा ओलांडून पाताळात जाऊन तेथील पाण्यावर अतीक्रमन केल्याचे दिसून येते. म्हणजेच मानवाने सापाच्या बिळात हात टाकला आहे.ज्या पाण्यावर मानवजातीचा तिळमात्र अधिकार नाही तेही पाणी आपण आपली तहान भागवण्यासाठी वापरीत आहोत.हा मानवाचा निसर्गसृष्टीवर खुला अन्याय व अत्याचार नाही काय?आज मानवाच्या निष्काळजीपणामुळे व अतिरेकामुळे जंगले वाळुन (सुकली)गेली आहे.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसले आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.अनेक देशात गृहयुद्ध व आता महायुद्ध सुरू आहे.उदाहरण द्यायचे झाले तर रशिया - युक्रेन,अमेरिका-इजरायल-इराण- गाजा-इराण- हिज्बुला यांनी महायुद्धाचे स्वरूप घेतले आहे यामुळे युद्धाने जनुकाय रक्ताची नदी वाहत आहे की काय असे वाटत आहे.सध्याच्या परिस्थितीत या देशात आगडोंब उसळला असुन अनेक क्षेत्र जळुन खाक झाले आहे.त्याचप्रमाणे अनेक देश परमाणुपरीक्षण करतांना आपण पहातो.अन्न,वस्त्र, निवारा आवश्यक आहे यात दुमत नाही.परंतु अन्न,वस्त्र, निवारा यांची उत्पत्ती ही पाण्यापासूनच होत असते.पाणी सुरक्षित तर मानव, पशुपक्षी,जीव-जंतु सुरक्षित,जिव सृष्टी सुरक्षित तर पृथ्वी सुरक्षित ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.आज अनेक देशांतील जंगल संपदा नस्तनाबुत करून कारखाने,शहरे मोठ्या प्रमाणात उभारले आहे.त्यामुळे भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात जंगलातील हिंसक प्राणी (वाघ,अस्वल, सिंह, कोल्हा, बिबट्या, जहरीले साप) शहरात शिरकाव करतांना दिसतात.यामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत हानी सुध्दा झाली आहे व होत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे जंगलातील पाण्याचा तुटवडा होय.आज पाण्यासाठी मानव व प्राणी एकमेकांचे कट्टर शत्रू बनल्याचे दिसून येते.त्यामुळे संपूर्ण जगाने पाणी वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे.असे भाकीत आहे की २०४० मध्ये भारतात प्यायला पाणी मिळणार नाही.नद्या, सरोवर, तलाव यामध्ये उपलब्ध असलेले पीण्याचे पाणी झपाट्याने प्रदुषित होत आहे.त्यामुळे कारखान्याचे दुषितपाणी व सांडपाणी यांना पीण्याच्या पाण्यापासून कोसो दूर ठेवण्याची गरज आहे.दूषित पाणी पील्यामुळे जगात दरवर्षी लाखोच्या संख्येने मानवीय हाणी व पशुपक्षांची हाणी मोठ्या प्रमाणात होतांना दिसुन येते यालाही थांबविण्याची गरज आहे. एकावर्षात पडलेले पावसाचे पाणी अडवीता आले तर पाच वर्षे पुरेल इतका पाणी साठा आपल्याला उपलब्ध होवू शकतो. परंतु त्यासाठी योग्य नियोजन करणे अजुनही आपल्याला जमले नाही.आज जगातील वाढती पाण्याची समस्या यामुळे अनेक पशुपक्षी लुप्त झाल्याचे दिसून येते.

- लेखक
**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
नागपूर मो.नं.९९२१६९०७७९



**बीड - उदघाटन प्रसंगी टेकवानी यांच्या स्पाईस गार्डन हॉटेलला भेट देवून शुभेच्छा देताना, डॉ.जेसवानी ,पिंगळे सर , ॲड टेकवानी ,प्रेम धायगुडे व टेकवानी परिवार.**

# गुढीपाडव्यापासून दिंद्रुड येथे शिवनाम सप्ताहास सुरुवात

दिंद्रुड दि. २१ (प्रतिनिधी)- गूढीपाडवा व नूतन वर्षाच्या शुभ मुहूर्तावर माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे शिवनाम सप्ताहाला सुरुवात झाली आहे. गेल्या ३२ वर्षापासून अखंड हा सप्ताह सुरू आहे. गुरुवारी सकाळी ग्रंथराज परम रहस्य पारायणास महिला -पुरुष भाविक- भक्तांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात सुरुवात करण्यात आली आहे.

या अखंड शिवनाम सप्ताहात राज्यभरातून भाविक मंडळी हजेरी लावतात. गुरुवार दि.१९ रोजी सकाळी श्री मन्मथ स्वामींच्या समाधीस अभिषेक करत ग्रंथराज परम रहस्याचे पारायण पठण करण्यात आले. सर्वश्री शि.भप.शिवानंद महाराज दापशेडकर, धनराज महाराज बुलबुले सामनगावकर, कीर्ती हिरेमठ लातूरकर, संगमेश्वर महाराज बिराजदार वलांडी कर, किशोरी चिद्रे चिद्रेवाडीकर, विरूपाक्ष महाराज वैरागकर, उमाकांत महाराज शिराळे फुलकळस, विश्वनाथ महाराज स्वामी वडवळकर आदी शिवभक्त परायण महाराजांच्या कीर्तनाचे आयोजन या सप्ताहात करण्यात आले आहे. शिवभक्त परायण ऋषिकेश महाराज गौरशेटे पुसकर यांच्या महाप्रसादपर कीर्तनाचे आयोजन २६ मार्च रोजी करण्यात आले आहे. या सप्ताह काळात मधुकरआप्पा शेळगावकर, मन्मथ विठ्ठलआप्पा नायगावकर, रामलिंग शंकरआप्पा कानडे, राहुल गुलाबराव हंगरगे, डॉ. सोमेश्वर नागनाथआप्पा काटकर, सतीश वसंतआप्पा काटकर, दिलीप सखारामआप्पा मुळे, बाबुराव गणपतराव पारेकर, दिनेश त्रिंबकआप्पा गौंडर, डॉ. दत्ता दगडूआप्पा भुजबळ, देविदास बंडाप्पा गौंडर, सतीश बबनआप्पा गौंडर यांनी अन्नदानाचा संकल्प घेतला आहे, सौ शिल्पा ओमप्रकाश शेटे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून कीर्तन श्रवण व प्रसाद भोजनास भाविक भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन समस्त वीरशैव समाज व ग्रामस्थ मंडळी दिंद्रुड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्राजक्ताताई धस यांच्या उपस्थितीत भव्य बालसाहित्य संमेलन

आष्टी दि २१ (प्रतिनिधी)- यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यांच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन २०२५' अंतर्गत, २३ मार्च २०२६ रोजी बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील वाळुंज येथे एका भव्य एकदिवसीय बालसाहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.'

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे साहित्य संमेलन : एक वाङ्मयीन चळवळ' या संकल्पनेवर आधारित हे संमेलन 'आद्यकवी मुकुंदराज साहित्य नगरीत' ज्येष्ठ बालसाहित्यिक डॉ. कैलास दौंड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.यामध्ये बालकवींचे कवीसंमेलन, बालसाहित्यिकांचे कथाकथन, अभ्यासक्रमातील साहित्यिकांच्या मुलाखती, तसेच निमंत्रित साहित्यिकांचेमार्गदर्शन व काव्य सादरीकरण असे विविध उपक्रम पार पडतील. संमेलनाचे विशेष आकर्षण म्हणून 'ओळख कवितेची' ही नाटिका आणि 'आम्ही शिवकन्या' या गीताचे सादरीकरण करण्यात येणार आहे. यावेळी कवी हनुमंत चांदगुडे, शंकर कसबे, सय्यद अल्लाउद्दीन, कथाकार वि.भा. साळुंके, सोमनाथ वाळके यांच्यासह शिक्षण व साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या उपक्रमाचे संयोजक व फेलोशिपचे मानकरी डॉ. हरिश्चंद्र नवनाथ हातवटे यांनी तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी या साहित्य सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

# नवोदय पुर्वपात्र परीक्षेत अजिंक्य ठोंबरे जिल्ह्यात चौथा

दिंद्रुड दि.२० (प्रतिनिधी) : नुकताच नवोदय विद्यालयाचा निकाल लागला असून यामध्ये दिंद्रुड पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल बालासाहेब ठोंबरे यांचा चिरंजीव अजिंक्य हा नवोदयच्या इयत्ता ६ वी पुर्वपात्र परीक्षेत पात्र झाला आहे. त्याने बीड जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळवून गावचे व शाळेचे नाव उज्वल केले आहे. नवोदयच्या पुढील शिक्षणासाठी तो पात्र ठरला असून अजिंक्य सह पात्र विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



जिल्ह्यात पात्र झालेल्या ८० विद्यार्थ्यांपैकी दिंद्रुड येथील सर्वाधिक १२ विद्यार्थी नवोदयासाठी पात्र झाले आहेत. दिंद्रुड येथील चार शाळेचे एकुण १२ विद्यार्थी नवोदय परीक्षेत उत्तीर्ण होत गढी येथील पीएम श्री नवोदय विद्यालयात पुढील शिक्षणासाठी पात्र ठरले आहेत. यामध्ये अजिंक्य ठोंबरे याने नवोदय परीक्षेत मोठे यश संपादन केले आहे. त्याने जिल्ह्यात चौथा क्रमांक पटकावला आहे. अजिंक्यने आतापर्यंत मंथन सामान्य ज्ञान परीक्षेत सलग दोन वर्षे माजलगाव तालुक्यातून प्रथम येण्याचा बहुमान मिळवलेला आहे.दद्रुड परिसरातील विद्यार्थी या परीक्षेत घवघवीत यश मिळवून नवोदय प्रवेशासाठी पात्र झाले आहेत. येथील खोलेश्वर विद्यालयाचे अजिंक्य अमोल ठोंबरे, राजवीर बप्पासाहेब डावकर, आदित्य सतीश धुमाळ, गोविंद विष्णू शेळके, वेदांत प्रफुल सलगरे,कु. मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ, शौर्य रामभाऊ वाघ, स्वप्नील लहुदास कांबळे, आर्यन शंकर मेंडके हे ९ विद्यार्थी तर व्यंकटेश पब्लिक स्कूल ची शरयु बाळु कोल्हापूरे, चंद्रभागा पोदार शाळेचा उज्वल गिते तसेच इतर शाळेतील श्रेयांश छत्रभुज घोडके असे एकूण १२ विद्यार्थी यावर्षी नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे दिंद्रुड येथील विविध शाळा प्रतिष्ठित नागरिक यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# नातेसंबंध जपत सामोपचाराने वाद मिटवण्याचा प्रभावी मार्ग म्हणजे मध्यस्थी-न्यायाधीश एम.ए.शिंदे



## पाटोदा न्यायालयात कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर उत्साहात

पाटोदा (प्रतिनिधी) : ''नातेसंबंध जपत वाद मिटवण्याचा प्रभावी मार्ग म्हणजे मध्यस्थी असून सामोपचारातून तोडगे काढल्यास न्यायालयांवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो,'' असे प्रतिपादन पाटोदा न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश मा. एम. ए. शिंदे यांनी केले. पाटोदा न्यायालयात आयोजित 'कायदेविषयक मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष ॲड.बी आर लवुळ होते.

यावेळी बोलताना न्यायाधीश एम ए शिंदे यांनी सांगितले की, न्यायालयीन प्रक्रियेत वाढता विलंब, प्रलंबित खटल्यांची संख्या आणि त्यातून निर्माण होणारा आर्थिक व मानसिक ताण लक्षात घेता, मध्यस्थी ही पर्यायी वाद निवारण पद्धती अधिक परिणामकारक ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सध्या देशात गुन्हेगारी वाढत असून त्याच अनुषंगाने न्यायालयातील प्रकरणांची संख्या वाढत आहे. परिणामी न्यायव्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत आपसातील वाद संवादातून आणि परस्पर सहमतीने सोडवण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

ते पुढे म्हणाले की, बीड जिल्हा संतांची भूमी असून संतांच्या विचारांनुसार आचरण केल्यास सामाजिक सलोखा अधिक दृढ होऊ शकतो. छोटे-मोठे तंटे एकत्र बसून मध्यस्थीच्या माध्यमातून न्यायालयाबाहेरही मिटवता येतात. यामुळे केवळ वेळ आणि खर्चाची बचत होत नाही, तर नातेसंबंधही अबाधित राहतात सध्याची संपूर्ण जगाची परिस्थिती पाहिली तर अत्यंत तणावपूर्ण परिस्थिती आहे अशा परिस्थितीत आपण सर्वांनी चांगला समतोल राखून सौहरदाने एकमेकांशी वागून माणुसकी जपणे गरजेचे आहे आणि कोणताही परिस्थितीत स्वतःचा आपला इगो बाजूला सारून जर आपसातील छोटे मोठे तंटे वाद मिटवण्याचा प्रयत्न केला तर निश्चित चांगला मार्ग मिळू शकतो आणि आयुष्याला एक चांगली दिशा मिळू शकते असे न्यायाधीश शिंदे यांनी याप्रसंगी सांगितले. शिबिरात 'मेडिएशन'ची कायदेशीर चौकट, प्रक्रिया, मध्यस्थाची भूमिका, तसेच सामोपचारातून होणाऱ्या निर्णयांची परिणामकारकता याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमास वकील संघाचे अध्यक्ष ॲड. बी. आर. लवुळ यांची उपस्थिती होती.उपस्थित वकिलांनी या प्रसंगी पाटोदा वकील संघाचे सर्व सदस्य तसेच पक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# माऊंट लिटरा झी स्कूलचा विद्यार्थी कार्तिक विजय मुंडे यांचे घवघवीत यश

परळी दि २१(प्रतिनिधी)- परळी येथील माऊंट लिटरा झी स्कूल च्या विद्यार्थ्यांनी यंदा विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचा नावलौकिक वाढवला आहे.



शाळेतील विद्यार्थी कार्तिक विजय मुंडे याने एकाच वेळी तीन महत्त्वाच्या परीक्षांमध्ये यश मिळवत 'हॅट-ट्रिक ऑफ सक्सेस' साध्य केली आहे. त्याने राष्ट्रीय मिलिटरी स्कूल प्रवेश परीक्षा (RMS) मध्ये उत्तीर्ण होत आपली गुणवत्ता सिद्ध केली, तसेच अखिल भारतीय सैनिक शाळा प्रवेश परीक्षा (-ISSEE) परीक्षेत यश मिळवले. याशिवाय त्याची निवड जवाहर नवोदय विद्यालय (JNV) मध्ये झाली आहे.या तिहेरी यशामुळे कार्तिक मुंडे याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्याने मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.शाळेचे अध्यक्ष डॉ. हरिश्चंद्र वंगे दादा, उपाध्यक्ष प्राध्यापक कैलास घुगे सर, प्राचार्य मंगेश काशीद सर प्राचार्य, शिक्षकवर्ग व पालकांनी कार्तिकचे अभिनंदन करत त्याच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी व सर्वांगीण विकासासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगण्यात आले.या यशामुळे माऊंट लिटरा झी स्कूल ची शैक्षणिक परंपरा अधिक बळकट झाली असून, भविष्यातही असेच यश मिळवत राहण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# सोन्याच्या दरात मोठी घसरण

मुंबई : मध्य पूर्वेतील सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर सोन्याच्या दरात चढ-उतार सुरू असल्याचं दिसत आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण पहायला मिळत आहे. या घसरणीमुळे सर्वसामान्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे तर दुसरीकडे गुंतवणुकदारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. इंडियन बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशनच्या (IBJA) माहितीनुसार, शुक्रवार सकाळपर्यंत २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १,४७,८८९ रुपये होता. जो दुपारपर्यंत प्रति १० ग्रॅम १,४७,३४० रुपयांवर पोहोचला. सायंकाळच्या बाजार बंद होईपर्यंत, सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १,४७,२१८ वर पोहोचला होता.

सोने आणि चांदीच्या दरात आज मोठी घसरण झाल्याचं पाहायला मिळालं. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशननुसार २४ कॅरेट सोन्याचा एका तोळ्याचा दर १५१६३७ रुपये इतका आहे. आजच्या दिवशी सोन्याच्या दरात ३२४२ रुपयांची घसरण झाली आहे.

# बीड येथील राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन आता ३ एप्रिल ऐवजी १ मे ला होणार सुरु

## आयोजक कृषीभूषण महेश बेदरे यांची माहिती

बीड (प्रतिनिधी) : मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने विविध ठिकाणी कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. यावर्षी बीड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार ३ ते ६ एप्रिल दरम्यान आयोजित करण्यात आलेले कृषी प्रदर्शन काही तांत्रिक कारणास्तव पुढे ढकलण्यात आले असून आता महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने १ मे ते ५ मे या कालावधीत भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन होणार असल्याची माहिती अयोजक कृषीभूषण महेश बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिलीआहे.

छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल (मल्टी पर्पज ग्राउंड), बीड येथील विस्तीर्ण मैदानावर पाच दिवसीय किसान कृषी महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांना नवतंत्रज्ञान उपलब्ध व्हावे या हेतूने किसान कृषी विकास प्रतिष्ठानने यापूर्वी गेवराई, जालना, परभणी, हिंगोली आदी ठिकाणी अशा प्रदर्शनांचे आयोजन केले आहे. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव पुन्हा एकदा बीड येथे हे प्रदर्शन होत आहे.

या प्रदर्शनात प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन, ओंकार साखर कारखाना समूह तसेच ऑल इंडिया इनपुट डीलर असोसिएशन यांचा विशेष सहभाग असणार आहे.

प्रदर्शनामध्ये आठ भव्य दालनांद्वारे सुमारे २०० कृषी उत्पादनांचे स्टॉल उभारण्यात येणार असून विविध कृषी अवजारांची प्रात्यक्षिके पाहण्याची संधी शेतकऱ्यांना मिळणार आहे. याशिवाय एकदिवसीय पशुप्रदर्शन, डॉग शो, तज्ज्ञांची चर्चासत्रे, धान्य महोत्सव, सौर ऊर्जेवरील उत्पादनांचे स्वतंत्र दालन, शेतमजुरीला पर्याय ठरणारी आधुनिक अवजारे यांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. उद्घाटन व समारोप सोहळ्याला विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार असून कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. बीड शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने कृषीभूषण महेश बेदरे यांनी केले आहे.

# माजलगावच्या समता कॉलनीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

माजलगाव दि.२१ ( प्रतिनिधी) : शहरातील भक्तांसाठी आध्यात्मिक पर्व ठरणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहास मंगळवार पासून (दि.२४ मार्च २०२६) सुरुवात होणार असुन या सप्ताहात श्री ज्ञानेश्वरी पारायण, श्रीमद भागवत कथा व ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज सद्गुरू संत श्री तुकाराम महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन तसेच वै. पिताश्री बप्पासाहेब व्यंकोबा सोळंके व वै. मातोश्री कस्तुराबाई बाप्पासाहेब सोळंके मातृ-पितृ पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह श्री ज्ञानेश्वर पारायण श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळ्यात प्रख्यात कथाकार ह.भ.प. बाळू महाराज जोशी (उखळीकर) यांचे श्रीमद् भागवत कथा तसेच विविध दिवसांमध्ये नामवंत कीर्तनकार, व भजनी मडळी यांच्या उपस्थितीत धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी भाविकांना अनुभवायला मिळणार आहे. सप्ताहादरम्यान दररोज पहाटे काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व हभप महारुद्र महाराज पवार हे करत आहे, दुपारी, २ ते ५ श्रीमद् भागवत कथा तसेच सायंकाळी हरिपाठ रात्री ८ ते १० हरी किर्तन व रात्री १० ते ११ संगीत भजन होईल दिनांक २४ मार्च रोजी ह.भ.प. योगेश महाराज सोळंके दिनांक २५ मार्च रोजी ह. भ. प .आत्माराम महाराज शास्त्री कुटे दिनांक २६ मार्च रोजी ह.भ. प. जयवंत महाराज बोधले २७ मार्च रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज काकडे २८ मार्च रोजी ह.भ.प. गुरुवर्य संदीपान महाराज हासेगावकर २९ मार्च रोजी ह. भ. प. देविदास महाराज मस्के ३० मार्च रोजी ह.भ.प. उमेश महाराज दशरथे मानवत आणि दिनांक ३१ मार्च रोजी ह.भ.प. गुरुवर्य एकनाथ महाराज माने बाबा यांचे काल्याचे किर्तन सकाळी ११ ते १ व नंतर महाप्रसाद होणार आहे. या सोहळ्यास मोठ्या संख्येने भाविक भक्तांनी उपस्थित राहून नामस्मरणाचा लाभ घ्यावा असे आवाहन ह.भ.प. तुकाराम नाना सोळंके, सुरेश सोळंके, दिलीप सोळंके, ह. भ. प. योगेश महाराज सोळंके, ओंकार सोळंके,आदींनी केले आहे.

## युद्धादरम्यान पंतप्रधान मोदींचा इराणच्या अध्यक्षांना फोन

नवि दिल्ली-पश्चिम आशियातील युद्धादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांनी इराणी जनतेला नवरोज आणि ईदच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. तसेच आखाती प्रदेशातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवरील हल्ल्यांचा निषेध केला. ऊर्जा प्रकल्पांवरील हल्ले हे प्रादेशिक स्थिरतेला धोका असल्याचे मत पंतप्रधान मोदींनी व्यक्त केले. एकूण तीन मुद्द्यांवर पंतप्रधान मोदींनी महत्त्वाची चर्चा केली. पंतप्रधान मोदी पान २ वर

# पार्श्वभूमी

## सदाशिव पेठेत औषध दुकानातून पावणेतीन लाखांची रोकड चोरी

पुणे : सदाशिव पेठेत औषध वितरकाच्या दुकानाचे कुलूप तोडून चोरट्यांनी गल्ल्यातील दोन लाख ८२ हजारांची रोकड लांबविल्याची घटना घडली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध विश्रामबाग पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका औषध वितरकाने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
पान २ वर



# ईद निमित्त ईदगाह मैदानावर नमाज; गेवराई शहरात विश्वशांतीसाठी दुवा


गेवराई दि.२१ (प्रतिनिधी):- पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने, शनिवार २१ रोजी सकाळी नऊ वाजता गेवराई शहरातील मोंढा नाका परिसरातील ईदगाह मैदानावर भक्तिभावात मुस्लिम बांधवांनी नमाज अदा करून, विश्वशांतीसाठी अल्लाह कडे दुवा केली.



गेवराई शहरातील मुस्लिम बांधवांनी ईदगाह मैदानावर प्रार्थनेसाठी गर्दी केली होती. नमाजनंतर एकत्रितपणे देशात व जगात सुख-शांती नांदावी यासाठी विशेष दुवा करण्यात आली. राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून मुस्लिम समाज बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान, गेवराई नगर परिषदेच्या वतीने ईदगाह मैदानावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. येथील परिसर स्वच्छ करण्यात आल्याने, धर्मगुरू मौलाना मुफ्ती साहब , ॲड.अब्बास शेख, माजी नगरसेवक सय्यद इजार सेट,ज्येष्ठ पत्रकार अय्युब बागवान यांनी समाजाच्या वतीने नप प्रशासनाचे, तसेच बाळराजे पवार यांचे आभार मानले. ईदगाह मैदानावर उपस्थित राहून माजीमंत्री बदामराव पंडित, माजी आ.अमरसिंह पंडित, भाजप नेते बाळराजे पवार, युवा नेते युद्धाजित पंडित, रोहित पंडित, गेवराई नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष ॲड. भगवान घुंबार्डे, ॲड.राजेंद्र राक्षसभुवनकर, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, शिवराज पवार, राहुल खंडागळे, लक्ष्मण राऊत, भरत गायकवाड, किशोर धोंडलकर, सभापती महेश सौंदरमल,यशराज पंडित, रणवीर पंडित आदींसह अनेक मान्यवरांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. प्रशासनाच्या वतीने तहसीलदार संदीप खोमणे, डीवायएसपी अनिल कटके, ना.तहसिलदार संजय सोनवणे, यांच्यासह पोलीस व महसूल विभागातील अधिकारी,
पान २ वर

### अंबाजोगाईचे सुपुत्र तथा सर्वोच्च न्यायालयाचे

# माजी न्यायमूर्ती सुधाकरराव कुर्डूकर यांचे निधन



**अंबाजोगाई दि.२१(प्रतिनिधी)– अंबाजोगाईचे सुपुत्र आणि भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती सुधाकर पंडितराव कुर्डुकर यांचे शनिवार २१ मार्च २०२६ रोजी मुंबई येथे दुःखद निधन झाले.मृत्यू समयी ते ९१ वर्षाचे होते.**

प्रदीर्घ न्यायिक कारकीर्द लाभलेल्या न्यायमूर्ती कुर्डूकर यांनी आपल्या कायदेविषयक ज्ञानाने आणि निस्पृह सेवेने भारतीय न्यायव्यवस्थेत मोलाचे योगदान दिले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच विधी क्षेत्रासह त्यांच्या मूळ गावी अंबाजोगाईत शोककळा पसरली आहे. मुंबईतील गिरगाव येथील चंदनवाडी स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. न्यायमूर्ती सुधाकर कुर्डूकर यांचा जन्म आणि प्राथमिक वास्तव्य अंबाजोगाई येथिल देशपांडे गल्लीत झाले होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक महत्त्वपूर्ण पान २ वर

# चारचाकी गाडीतुन अज्ञाताने एक लाख लांबविले

## ग्रामीण पोलिसात फिर्याद

**माजलगांव दि.२१(प्रतिनिधी):– शहरापासुन जवळच असलेल्या परभणी चौकातील मोरेश्वर हॉटेल समोर लावलेल्या स्विफ्ट डिझायर क्रं. एमएच ०६ एएस ५५५२ यर चारचाकी गाडीतुन दि. २० शुक्रवारी अज्ञात चोरट्याने लांबविले असुन याप्रकरणी ग्रामीण पोलिसात सुमन खंडु झेटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, शुक्रवारी परभणी चौकातील मोरेश्वर हॉटेलसमोर लावलेल्या स्विफ्ट डिझायर गाडीच्या सिटकव्हरमध्ये कॅरीबॅगमध्ये ठेवलेले नगदी एक लाख रूपये अज्ञात चोरट्याने गाडी लॉक व गाडीत कोणीही नसल्याचा फायदा घेवुन चोरले असुन याप्रकरणी ग्रामीण पोलिसात फिर्यादी सुमन खंडु झेटे रा. मोगरा यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक फौजदार बळवंते हे करत आहेत. दरम्यान परभणी चौकात असलेल्या सिसीटीव्ही कॅमे-यात सदरील चोरटे कैद झाले असुन पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविल्यास निश्चीतच चोरटे तात्काळ सापडतील अशी अपेक्षा फिर्यादी व त्यांच्या नातेवाईकांनी व्यक्त केली.

## जातीय तेढ निर्माण करणाऱ्या तरुणास अटक करण्याची मागणी



गेवराई, दि.२१ (प्रतिनिधी) ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके यांना २० मार्च रोजी एका समाजकंटकांनी फोन द्वारे अर्वाच भाषेत बोलल्या बद्दल दोन समाजातील तेढ निर्माण करण्याच्या भावनेने कॉल करून हाके यांना धमक्या देणाऱ्या तरुणाला शिक्षा करण्याच्या उद्देशाने २१ मार्च रोजी गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलीस स्टेशनमध्ये जाऊन संबंधित इसमाच्या विरोधात गुन्हा दाखल केला. यावेळी उपस्थित ओबीसी संघर्ष समितीचे बजरंग भाऊ सानप, बलभीम बारगजे,सुशील कोळेकर,सुनील पाटील ढाकणे,राजेभाऊ पोकळे, किशोर चौधरी ,बाळासाहेब हराळे,ज्ञानेश्वर हवाले व इतर ओबीसी संघर्ष समितीतील गेवराई तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

# ऊसतोडणी कामगारांच्या विविध मागण्यासंदर्भात उद्या उपोषण

बीड दि २१(प्रतिनिधी) अनेक वर्षापासुन ऊसतोड कामगारांचे विविध प्रश्न प्रलंबित आहेत. शासनाच्या उदासीन धोरणामुळे त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते याबाबत गांभीर्याने उपाययोजना होणे अत्यंत गरजेचे आहे. याबाबत गेली दहा वर्षापासून मी वेळोवळी लोकशाहीमार्गाने या अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न करत असुन जिल्हाधिकारी कार्यालय बीड- साखर सह संचालक छत्रपती संभाजीनगर -साखर आयुक्त कार्यालय पुणे साखर संकुल मुंबई ते आझाद मैदानापर्यंत वेळोवेळी निदर्शने, व उपोषने केलेली आहेत. मात्र अद्यापपर्यंत ऊसतोड कामगारांना योग्य प्रमाणात न्याय न मिळाल्यामुळे या ऊसतोड कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी दिनांक २३ मार्च २०२६ पासुन बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आपण आमरण उपोषणाला बसणार आहे असा इशारा पांडुरंग आंधळे यांनी दिला आहे

यासंदर्भात केलेल्या मागण्यांमध्ये ऊस तोडणी भरणीचा दर प्रति टन ५०० रू. करून ऊस वाहतूक दरात दुप्पट वाढ करावी. ऊस तोडणी भरणी कामाचा दर वाढीचा कसर प्रत्येक वर्षी करण्यात यावा २) ऊस तोडणीच्या कालावधीत प्रसुती होणाऱ्या ऊसतोडणी कामगार मातांना २५,००० रू.एक महिन्यात खात्यावर जमा करावे.३) ऊसतोड कामगारांची नोंदणी साखर कारखान्यावरील यादी प्रमाणे करून ओळखपत्र देण्यात यावे.४) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत गळीतहंगाम २०१४-१५ साठी ची विधानसभेतुन जाहिर केलेली २०% मजुरी दर वाढ देण्यात यावी. सदरील मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी बाळासाहेब मोरे पाटील राष्ट्रीयअध्यक्ष शिवशाहू ऊसतोड कामगार संघटना यांच्या मार्गदर्शनाखाली आपण बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणासाठी बसणार आहे. तरी पुढील सर्व परिणामांची जबाबदारी शासनाची राहील याची असा इशारा दिला आहे

## ४ हजार किलोमीटरवरील ‘डिएगो गार्सिया’ हवाई तळावर डागल्या मिसाईल्स

नवि दिल्ली- अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील युद्धाला २० दिवस पूर्ण झाले आहेत. मात्र, अद्यापही हे युद्ध थांबलेलं नाहीये. अमेरिका-इस्त्रायल रोज इराणवर हल्ले करत आहेत, तर इराणही प्रतिहल्ले करत आहे. या युद्धात आतापर्यंत इराणच्या अनेक मोठ्या नेत्यांचा आणि लष्करी अधिकाऱ्यांचा मृत्यू झाल्याने इराणचं मोठं नुकसान झालं आहे. पण तरीही इराणने माघार घेतलेली नाही, उलट आता इराणने आणखी आक्रमक भूमिका घेतल्याचं दिसत आहे. इराणने अमेरिकेवर सर्वाधिक लांब पल्ल्याचा हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. इराणने हिंद महासागरातील अमेरिकेच्या डिएगो गार्सिया हवाई तळावर अनेक मिसाईल्स डागल्याची माहिती सांगितली जात आहे. पान २ वर

# माजलगावच्या राजस्थानी मंगल कार्यालयाने चार लाख ५० हजार रूपयांचा कर भरला

### शहरवासीयांनी आपला मालमत्ता कर,नळपट्टी भरून सहकार्य करा

### मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांचे आवाहन

माजलगाव दि.१९(प्रतिनिधी):- मार्च एंड मुळे माजलगाव नगरपरिषदेने वसुली मोहीम सुरू केली असून शहरवासीयांनी मालमत्ता कर नळपट्टी कर बांधकाम फीस इतर कर नगर परिषदेला भरणा करून सहकार्य करावे असे आवाहन नगरपालिकेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांनी केले आहे शहरातील राजस्थानी मंगल कार्यालयाने एक मुखी चार लाख ५० हजार रुपयांचा कर भरणा केल्याबद्दल नगरपरिषदेच्या वतीने राजस्थानी मंगल कार्यालयाचे अध्यक्ष बालकिशन इंदानी यांचा सत्कार करून आभार व्यक्त पान २ वर



# पाटोद्यात रमजान ईद उत्साहात



पाटोदा दि.२१(प्रतिनिधी):- पाटोदा शहर व तालुक्यात मुस्लीम बांधवांचा अत्यंत पवित्र समजला जाणारा रमजान ईद चा सण शनिवार दि.२१ मार्च रोजीअत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

शहरातील ईदगाह मैदानावर सकाळी मुख्य नमाज अदा करण्यात आली यावेळी सर्वत्र सुख समृद्धी व शांती लाभावी अशी दुवा मागण्यात आली या प्रसंगी शहरातील हजारो मुस्लीम बांधवांची उपस्थिती होती. यानंतर उपस्थित हिंदू - मुस्लीम बांधवांनी ईद मुबारक म्हणत एकमेकांना शुभेच्छा दिल्या. संपूर्ण दिवसभर पाटोदा शहरात अत्यंत उत्साहाचे वातावरण होते एकमेकांच्या घरी शिरखुर्माचा आस्वाद घेण्यासाठी मित्र परिवाराला आमंत्रित केले जात होते मुस्लिम बांधव व हिंदू बांधव एकत्रितरित्या रमजान ईदचा सण अत्यंत उत्साहाने साजरा केला गेला.

# हिंदु समाजाच्या संघटनांनी एकत्र येण्याची गरज–महंत गौरीशंकर गिरी

माजलगांव दि.२१ (प्रतिनिधी) :-हिंदू समाजाची एकता, संस्कृतीचे जतन आणि सामाजिक बांधिलकी यावर मार्गदर्शन करत भविष्या तील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी हिंदू समाजाच्या संघटनांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे महंत गौरी शंकर गिरी देवगिरी महाराज यांनी केले.



### ■ सिध्देश्वर मंदिरात हिंदू संमेलन ■

श्री.सिद्धेश्वर मंदिर माजलगाव येथे दि.२० मार्च २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता आयोजित भव्य हिंदू संमेलन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि मोठ्या जन समुदायाच्या उपस्थितीत यशस्वीरीत्या संपन्न झाले. झेंडा चौक व परिसरा तील विविध भागांतून नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. संपूर्ण परिसर भगव्या वातावरणाने न्हाऊन निघाला होता. कार्यक्रमात महंत गौरीशंकर गिरी देवगिरी महाराज यांचे प्रेरणादायी आशीर्वचन लाभले त्यांनी त्यांच्या प्रखर वाणीतून पान २ वर

# धारूरचा घाट बनला मृत्यूचा सापळा

किल्ले धारूर दि २१(प्रतिनिधी)- खामगाव- पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील धारूर शहराच्या पायथ्याशी असलेला हा ३ किलोमीटरचा घाट अत्यंत अरुंद आणि नागमोडी वळणांचा आहे.धक्कादायक बाब म्हणजे, मागील केवळ आठ दिवसांत या घाटात सहा अपघात घडले असून, यात २० हून अधिक नागरिक जखमी झाले आहेत.बुधवारी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास पुन्हा एक भीषण अपघात घडला.या अपघातात एकूण ६ जण जखमी झाले असून, त्यातील केज येथील चौघांची प्रकृती गंभीर आहे .आजवर या घाटाने ५० पेक्षा अधिक जणांचा बळी घेतला आहे अजून किती जणांचा हा बळी घेणार आहे असा प्रश्न पडला आहे. प्रशासनाने अरूंद घाटाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा तसेच येथे ठोस सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी संतप्त वाहनधारकांनी केली आहे.

धारूर घाटातील अपघातांची मालिका थांबण्याचे

### आठच दिवसांत सहा अपघात

### ट्रकसह कार २०० फूट दरीत

नाव घेत नसून, बुधवारी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास पुन्हा एक भीषण अपघात घडला. वळणाचा अंदाज न आल्याने साखर वाहतूक करणाऱ्या ट्रकने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या स्विफ्ट कारला (क्रमांक एमएच. ४७, एन. २३२०) जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दोन्ही वाहने सुमारे २०० फूट खोल दरीत कोसळली. या घटनेत एकूण ६ जण जखमी झाले असून, त्यातील केज येथील चौघांची प्रकृती गंभीर आहे.

साखर घेऊन जाणारा ट्रक (क्रमांक एमएच. ३८, डी. ६६८८) घाटातून उतरत असताना चालकाचा ताबा सुटला. नियंत्रण सुटलेल्या या ट्रकने केजकडे जाणाऱ्या व रस्त्याच्या



कडेला उभ्या असलेल्या कारला जोराची धडक दिली. धडकेनंतर दोन्ही वाहने थेट दरीत कोसळली. अपघाताचा आवाज होताच स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. पोलिस आणि आपत्कालीन पथकाने क्रेन व दोरीच्या साहाय्याने जखमींना दरीतून बाहेर काढून
पान २ वर

### भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात प्रकरणात

# रूपाली चाकणकरांना सहआरोपी करुन अटक करावी–गणेश वरेकर

बीड दि.२१(प्रतिनिधी): नाशिक येथील कथित भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याने महिलांची केलेली फसवणूक आणि अत्याचाराचे प्रकरण सध्या राज्याच्या राजकारणात चांगले च तापले आहे. महिलांवरील अत्याचाराचे ५८ व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या प्रकरणात आता शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आक्रमक भूमिका घेण्यात आली असून, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) महिला प्रदेशाध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर सह-आरोपी म्हणून गुन्हा दाखल करण्याची आणि तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे. शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांच्याकडे ही मागणी केली आहे.गणेश वरेकर यांनी आपल्या पत्रात खळबळजनक आरोप पान २ वर

### गेवराई येथील अंबाजोगाई पिपल्स बँकेत

# मॅनेजरच्या हलगर्जीने कर्ज प्रकरणे प्रलंबित

गेवराई दि.२१ (प्रतिनिधी) - गेवराई येथील अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि. या बँकेच्या मॅनेजरच्या हलगर्जीपणामुळे अनेक कर्ज प्रकरणे प्रलंबित राहणे हि गंभीर समस्या असून यामुळे खातेदारांमध्ये मोठी नाराजी निर्माण होत चालली आहे. या समस्येमुळे अनेकदा कर्ज मंजुरीला विलंब, दस्तऐवजांची अनावश्यक मागणी आणि तांत्रिक कारणांमुळे खातेदारांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अंबाजोगाई पिपल्स बँक सेवेवरील ग्राहकांचा विश्वास कमी होताना दिसत आहे. अनेकदा कर्ज मंजुरी प्रक्रियेत बँक मॅनेजरची उदासीनता किंवा हलगर्जीपणा दिसून येतो. ज्यामुळे ग्राहकांना वारंवार पान २ वर

# पिंपळनेरसह परिसरात गारपीट; पिकांचे प्रचंड नुकसान

पिंपळनेर दि.२१(प्रतिनिधी):-बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात गुरुवारी (दि. १९) सायंकाळी पावणेसहा वाजता अर्धा तास अवकाळी पावसासह गारपीट झाली. या गारपिटीमुळे शेतातील रब्बी पिकांचे, फळबागांचे नुकसान झाले आहे.आंब्याचा तर सडाच पडला होता. पिंपळनेरसह परिसरातील ताडसोन्ना, घाटसावळी ,मन्यारवाडी,सांडरवन, पिंपळादेवी,लिंबारुई सह वाडी, वस्ती,गावात जोरदार वादळी वारे व विजेच्या कडकडाटासह झालेल्या अवकाळी पावसाने सर्वत्र पाणीच पाणी साचले होते. सध्या काढणी चालू असलेल्या गहू, हरभरा, ज्वारी पिकांचे प्रचंड नुकसान झाले. तसेच, डाळिंब, द्राक्ष, पेरू, केळी ,अंबा आदी फळबागांनाही या गारपिटीचा फटका बसला आहे. द्राक्षबागांनाही फटका बसून द्राक्षांना तडे जाऊन फळ गळती झाली.तसेच गारपिटीमुळे आंब्याची झाली मोठी फळगळ झाली आहे, असे फळ उत्पादक शेतकरी श्रीकांत ठोकरे यांनी सांगितले. तसेच शेतातील चारा पिकांची वादळी वाऱ्याने जमिनीवर लोळून हानी झाली आहे. शिवाय, आंबा पिकाची मोठ्या प्रमाणावरती फळगळ झाल्याचे शेतकरी कुंडलिक जाधव यांनी सांगितले.

CMYK